विकणे आहे
भेंडा खुर्द, ता. नेवासा
येथील मुख्य गल्लीतील
राहण्यास योग्य प्लॉट
योग्य किंमत आल्यास
तातडीने विकणे आहे.
संपर्क : +91 9850386599

दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २०३ I गुरूवार ७ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com




# बँकांचे कर्ज फेडण्यासाठी मराठा तरुण सावकाराच्या दारात

## आण्णासाहेब पाटील महामंडळाकडून हप्ते भरूनही वर्षापासून परतावा मिळेना

**विशेष प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** मराठा समाजातील तरुणांना हक्काचा रोजगार आणि उद्योजक बनवण्याचे स्वप्न दाखवून स्थापन झालेले अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ सध्या निधीअभावी अडचणीत सापडले आहे. महामंडळाच्या माध्यमातून १५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना सुरुवातीला अत्यंत यशस्वी ठरली. मात्र, गेल्या वर्षभरापासून या योजनेतील लाभार्थ्यांना व्याजाचा परतावा वेळेवर मिळत नसल्याने राज्यभरातून मराठा समाजात संताप व्यक्त केला जात आहे. सरकारकडून व्याजाचा परतावा मिळत नसल्याने लाभार्थ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अनेक तरुण उद्योजकांनी आपला व्यवसाय टिकवण्यासाठी आणि योजनेतून बाद होऊ नये म्हणून बँकांचे हप्ते भरण्यासाठी चक्क सावकारांकडून कर्ज घेण्यास सुरुवात केली आहे.

| तपशील | आकडेवारी |
|---|---|
| एकूण नोंदणीकृत अर्जदार | ४ लाख २२ हजार |
| बँक कर्ज मंजूर लाभार्थी | १ लाख ८० हजार |
| वितरित केलेली कर्ज रक्कम | १८ हजार २२२ कोटी रुपये |
| आतापर्यंत झालेला व्याज परतावा | १,६३३ कोटी ५१ लाख रुपये |
| महामंडळाची सरकारकडे नवीन मागणी | ४०० कोटी रुपये |

सध्या महामंडळाने सरकारकडे ४०० कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. हा निधी मिळाल्यासच प्रलंबित व्याजाचा प्रश्न सुटू शकणार आहे. तोपर्यंत मात्र राज्यातील हजारो मराठा तरुण उद्योजक हप्त्यांच्या ओझ्याखाली दबले जात आहेत.

या परिस्थितीवर बोलताना महामंडळाचे माजी उपाध्यक्ष संजय पवार यांनी राज्य सरकारकडे तातडीने व्याजाचा परतावा करण्याची मागणी केली आहे. अतिशय चांगल्या पद्धतीने चाललेले हे महामंडळ सरकार बंद करण्याच्या विचारात आहे का? अशी शंका आता उपस्थित होत आहे. दुसरीकडे, सरकारने लवकरात लवकर निधी न दिल्यास राज्यभर 'बोंब मारू' आंदोलन करण्याचा इशारा मराठा महासंघाचे वसंत मुळीक यांनी दिला आहे.



**नियमानुसार लाभार्थ्याने बँकेचे तीन हप्ते नियमित भरले की महामंडळ त्यावरील व्याजाचा परतावा लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करते. जर एक जरी हप्ता चुकला, तर लाभार्थी योजनेतून कायमचा बाद होतो. या भीतीपोटी मराठा तरुणांनी बँकांचे हप्ते वेळेवर भरले, पण आता सरकारने व्याजाचा परतावा रोखल्याने हे तरुण आर्थिक कात्रीत सापडले आहेत. त्यामुळे लवकरात कर्जाचा परतावा सरकारकडून हस्तांतरित करण्यात यावा, अशी मागणी तरुणांकडून केली जात आहे.**

## कुंडलिनी शक्ती व आत्मसाक्षात्कार


'सहजयोग'
भाग ४५

कुंडलिनी नावाची एक शक्ती आपल्यात असते, तिनी सबंध आपलं ब्रह्मांड रचले आहे. आणि शेवटी ती वाट बघत असते त्यावेळेची जेंव्हा असा कोणी अधिकारी पुरूष परमेश्वराकडून त्या कुंडलिनीचे उत्थापन करू शकेल. म्हणजे असं की बी असलं आणि बी ला तुम्ही असं ठेवलं तर काही त्याच्यावर परिणाम होणार नाही. पण त्या बी मध्ये ती सुप्त शक्ती आहे की ज्याने त्याच्यामध्ये अंकुर फुटू शकेल. जेंव्हा तुम्ही त्या बी ला आपल्या पृथ्वीच्या उदरात घालाल तेंव्हा ते जाणून घेईल आता आम्ही पृथ्वीच्या उदरात आलो आणि त्यात अंकुरिले. तशीच ही शक्ती तुमच्यात वास करत असते. जेंव्हा तुम्ही अशा एखाद्या महायोग्याच्या सन्निध येता तेंव्हा ती कुंडलिनी आपोआप उभी राहील. ही कुंडलिनी म्हणजे तुमच्यामध्ये असलेली इच्छा शक्ती आहे. ती इच्छा जिथे तुम्ही परमेश्वराला एकाकार झालं पाहिजे. ही तुमच्या मध्ये सुप्तावस्थेमध्ये ही इच्छा आहे आणि त्या इच्छेमुळेच तुम्ही अमिबाचे मनुष्य झालात, मानव झालात. ही मानवाकृती तुम्ही अशी मिळवलीत की ह्या मानवाकृतीतच अस काही आहे एक मंदिर आहे. आत्म्याचा दिवा पेटवला जाणार आहे. ही कुंडलिनी जेंव्हा जागृत होते तेंव्हा ती सहा चक्रांना भेदून ह्या डोक्याला इथे ब्रह्मरंध्रावर येऊन धकधक असा तिचा आवाज पुष्कळांना ऐकू येतो. पुष्कळांची दिसतेसुद्धा पुष्कळांची तुम्ही बघूसुद्धा शकता. ज्यांना अटकाव असतो त्यांची दिसते सुद्धा शकता. आणि त्याच्यानंतर तिथे फोडून, हे ब्रह्मरंध्र फोडून तुम्हाला सूक्ष्म दशेला घेऊन जाते. – ०१ फेब्रुवारी १९८२ राहुरी अधिक माहितीसाठीअधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### शासकीय कर्मचाऱ्यांची हिंदी भाषेच्या परीक्षेला स्थगिती

मुंबई : महाराष्ट्र सरकार च्यावतीने शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी २८ जूनला हिंदी भाषेची परीक्षा घेण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. या घोषणेमुळे राजपत्रित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ही परीक्षा द्यावी लागणार होती. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयानंतर शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि इतर काही संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा मराठी विरुद्ध हिंदी भाषा वादाला तोंड फुटण्याची शक्यता होती. या घडामोडीनंतर आता शासकीय कर्मचाऱ्यांची घेण्यात येणाऱ्या हिंदी भाषेच्या परीक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या संदर्भातील माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली. महाराष्ट्रात मराठी भाषा असताना हिंदी भाषेची सक्ती का? यामागील कारण काय? असे अनेक सवाल विचारले जात होते. त्यानंतर अखेर सरकारने शासकीय कर्मचाऱ्यांच्या हिंदी भाषा परीक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. सामंत म्हणाले, मला माध्यमांमधूनच कळलं की मराठी भाषा संचालनालयाकडून अशा प्रकारची परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर मी आता आमचे प्रधान सचिव किरण कुलकर्णी यांच्याशी चर्चा केली.

# शिरापूर घाटात भीषण अपघात, चुलती-पुतणीचा मृत्यू

## हळदी समारंभासाठी जाताना घडली घटना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** अंभोरे येथे नातेवाईकांच्या हळदी समारंभासाठी जात असलेल्या दोन महिलांचा मोधळवाडी ते शिरापूर घाटात झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे विवाहस्थळी शोककळा पसरली आहे. जया दत्तू थोरात आणि अस्मिता दादा थोरात, रा. मोधळवाडी अशी मृत्यूमुखी पडलेल्या चुलती-पुतणीची नावे आहेत.

अंभोरे येथील वाकचौरे कुटुंबातील विवाह सोहळा बुधवार (दि.६ मे) रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी मोधळवाडी येथून एक पुरुष, दोन महिला आणि एक मुलगी असे तिघेजण मोटरसायकलवरून अंभोरे येथे हळदी समारंभासाठी निघाले होते. मोधळवाडी-शिरापूर घाट मार्गावरून जात असताना भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर टेम्पोने (क्र. एमएच ४२ बीएफ ९०९४) मोटरसायकलला जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात मोटरसायकलवरील जया थोरात व अस्मिता थोरात या दोघी टेम्पोच्या चाकाखाली सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालक टेम्पो जागीच सोडून फरार झाला. घटनेची माहिती समजताच मोधळवाडी व परिसरातील नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. एकच गर्दी झाली होती. घारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी संगमनेर ग्रामीण रुग्णालयात पाठवले. अपघातग्रस्त आयशर टेम्पो पोलिसांनी ताब्यात घेतला असून उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### आनंदाच्या क्षणी दुःखाचा डोंगर

**संगमनेर तालुक्यातील अंभोरे येथील वाकचौरे व मोधळवाडी येथील थोरात या दोन कुटुंबांमध्ये बुधवारी शुभविवाह होणार होता. मंगळवारी हळदी समारंभासाठी जात असताना काळाने घाला घातला. नियतीच्या या क्रूर खेळीमुळे विवाहस्थळी असलेला आनंद क्षणात दुःखात बदलला असून संपूर्ण कुटुंबावर शोककळा पसरली आहे.**



## श्रीरामपूर हादरलं !

# गर्भलिंग निदान-गर्भपात रॅकेटचा भांडाफोड

- इंडियन मेडिकल असोसिएशनच्या माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. रवींद्र कुटेंसह दोन एजंट अटकेत
- पोर्टेबल मशीनद्वारे कारमध्येच चालायचा काळा धंदा; २५ लाखांचा मुद्देमाल जप्त
- अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या पथकाची धडक कारवाई

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : श्रीरामपूरसह राहता तालुक्यात सुरू असलेल्या बेकायदा गर्भलिंग निदान आणि मुलींच्या गर्भपाताच्या धक्कादायक रॅकेटचा अखेर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात श्रीरामपूरातील प्रसिद्ध डॉक्टर तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. रवींद्र कुटे यांच्यासह दोन एजंटला अटक करण्यात आली असून या संपूर्ण प्रकरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार राहता तालुक्यातील पिंपरी निर्मळ शिवारात निळवंडे कालव्यालगत असलेल्या एका खोलीमध्ये महिलांकडून दहा ते पंधरा हजार रुपये घेऊन बेकायदा गर्भलिंग निदान केले जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने सापळा रचत छापा टाकला आणि संपूर्ण रॅकेट उघडकीस आले.

या कारवाईत नेवासा तालुक्यातील डॉ. राहुल भनगे, पिंपरी निर्मळ येथील दिलीप भुसाळ यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्यांच्याकडून लाईफ प्लस यूएसजी लॅपटॉप प्रोब मशीन, मोबाईल फोन, रोख रक्कम, गर्भलिंग तपासणीसाठी वापरण्यात



येणारे साहित्य तसेच तीन कार असा तब्बल २५ लाख ९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तपासादरम्यान या रॅकेटमध्ये एजंट म्हणून काम करणारे प्रदीप ढगे आणि निलेश भवर यांची नावे समोर आली. हे दोघे गर्भवती महिला, एजंट आणि डॉक्टर यांच्यात समन्वय साधत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. या दोघांना ताब्यात घेतल्यानंतर चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली. श्रीरामपूरातील प्रसिद्ध डॉक्टर डॉ. रवींद्र कुटे यांच्या हॉस्पिटलमध्ये मुलगी असल्याचे निष्पन्न झालेल्या महिलांचे गर्भपात करण्यात येत असल्याचे उघड झाले.

विशेष म्हणजे डॉ. कुटे यांनी पोलिसांसमोर संबंधित गर्भपात केल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली असून त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल करत अटक केली. या प्रकरणामुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे.

पोलिसांच्या तपासात आणखी धक्कादायक बाब समोर आली आहे. मोबाईलला जोडल्या जाणाऱ्या पोर्टेबल मशीनच्या सहाय्याने कारमध्ये किंवा एखाद्याच्या घरी कुणाच्याही नजरेत न येता गर्भलिंग निदान केले जात होते. एका दिवसात तब्बल १२ ते १५ महिलांची तपासणी केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. एका महिले कडून १५ हजार रुपये घेतले जात होते. त्यातील पाच हजार रुपये एजंटला आणि दहा हजार रुपये डॉक्टरकडे जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

लिंगनिदान चाचणी **(पान ४ वर)**

### पुण्यापर्यंत धागेदोरे..?

**या प्रकरणाचे धागेदोरे आता पुण्यापर्यंत पोहोचले असून आणखी काही डॉक्टर, एजंट आणि दलाल या रॅकेटमध्ये सहभागी असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. एजंट प्रदीप ढगे याच्याकडून आणखी एक लिंग निदान मशीन जप्त करण्यात आले आहे.**

# सुनेत्रा पवारांचा खासदारकीचा राजीनामा

## छगन भुजबळ की आनंद परांजपे यांना संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या खासदारकीचा राजीनामा दिला. त्यांच्या जागी आता राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री छगन भुजबळ की माजी खासदार आनंद परांजपे यांना संधी मिळते याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी तीन महिन्यापूर्वी सूत्रे हाती घेतली होती. त्यानंतर बारामती विधानसभा मतदार संघात मोठा विजय सुनेत्रा पवार यांनी सोमवारी



झालेल्या निवडणुकीत मिळवला. त्यामुळे त्यांना कोणत्यातरी एका पदाचा राजीनामा द्यावा लागणार होता. बुधवारी दुपारनंतर त्यांनी दिल्लीला जाऊन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे खासदारकीचा राजीनामा सादर केला. त्यांच्या खासदारकीची मुदत अजून दोन वर्ष शिल्लक आहे. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेसमधील एका ज्येष्ठ मंत्र्यांच्या नावाची चर्चा जोरात सुरु असून याठिकाणी त्यांची वर्णी लागणार असल्याने उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

खासदारकीसाठी राष्ट्रवादीकडून मंत्री छगन भुजबळ यांच्यासह माजी खासदार आनंद परांजपे यांचे नाव देखील चर्चेत आले आहे. त्यामुळे आता आगामी काळात होत असलेल्या या जागेच्या पोटनिवडणुकीसाठी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता लागून राहिली आहे.

बुधवारी दुपारनंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दिल्ली दौऱ्यावर गेल्या होत्या. यावेळी त्यांनी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. त्यासोबतच त्यांच्या खासदारकीचा राजीनामा त्यांच्याकडे सादर केला. सुनेत्रा पवार या बारामती विधानसभा निवडणुकीत निवडून आल्या असल्याने त्यांनी आपला राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला आहे.

नियमानुसार दोन्ही सभागृहात निवडून आलेल्या व्यक्तीला एका सभागृहाचा राजीनामा १४ दिवसांच्या आत देणं बंधनकारक असते. त्यामुळेच, आमदारकीच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होताच, त्यांची आपला खासदारकीचा राजीनामा दिला. आता, लवकरच सुनेत्रा पवार यांच्या रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेवर पोटनिवडणूक जाहीर होणार आहे.

# साई रिसॉर्टप्रकरणात अनिल परब निर्दोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा आमदार अनिल परब यांच्यावर भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी गंभीर आरोप केले होते. दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात जमीन हडप केल्या आणि शासनाच्या सीआरझेडच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला होता. मात्र, आता खेड येथील अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाने दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात मोठा निर्णय देत शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

रत्नागिरी जिल्ह्याच्या दापोली तालुक्यातील मुरुड येथे असलेल्या साई रिसॉर्टशी संबंधित प्रकरणात आरोपींवर सीआरझेड नियमांचे उल्लंघन करून बांधकाम केल्याचा, तसेच खोटी कागदपत्रे **(पान ४ वर)**

## संपादकीय

### गर्भातील मुलींचा खून : विकृत समाजमानस आणि अपयशी व्यवस्था

श्रीरामपूर–राहाता परिसरात उघडकीस आलेल्या गर्भलिंग निदान आणि गर्भपात रॅकेटने संपूर्ण राज्य हादरले आहे. डॉक्टर, एजंट, दलाल आणि कुटुंबीय यांच्या संगनमतातून गर्भातील मुलींची हत्या केली जात असल्याचे समोर आले आणि पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या पुरोगामी चेहऱ्यावर काळा डाग उमटला. ही केवळ एका गुन्हेगारी टोळीची घटना नाही; तर समाजाच्या मानसिकतेतील भीषण विकृतीचे भयावह चित्र आहे.

आज विज्ञान प्रगतीसाठी वापरले जाण्याऐवजी गर्भातील मुलगी संपवण्यासाठी वापरले जात आहे. मोबाईलला जोडल्या जाणाऱ्या पोर्टेबल मशीनच्या सहाय्याने कारमध्ये किंवा घरातच गर्भलिंग निदान केले जात होते, ही बाब तर अधिक धक्कादायक आहे. विज्ञानाचा वापर जीवन वाचवण्यासाठी व्हायला हवा होता; मात्र इथे तो जीव घेण्यासाठी होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

भारतात महिला भ्रूणहत्या ही नवीन समस्या नाही. मात्र गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात तिचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील नवजात मुलींचे प्रमाण २०१५–१६ मध्ये १००० मुलांमागे ९२४ होते; ते २०२० मध्ये ९१३ वर घसरले. ०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील बाललिंग गुणोत्तर केवळ ८८३ इतके होते, जे राष्ट्रीय सरासरीपेक्षाही कमी होते.

विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुलींच्या जन्मदरात मोठी घट झाल्याची नोंद आहे. बीड, वाशीम, बुलढाणा, हिंगोली यांसारख्या जिल्ह्यांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातही कोपर्डीसारख्या अमानुष घटनेपासून महिलांविरोधातील अत्याचारांचे प्रमाण सातत्याने चर्चेत राहिले आहे.

खरे पाहता, महिला भ्रूणहत्या ही केवळ वैद्यकीय गुन्हा नसून सामाजिक मानसिकतेचे अपयश आहे. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आणि मुलगी म्हणजे आर्थिक बोजा, ही मानसिकता अजूनही ग्रामीण आणि शहरी भागात खोलवर रुजलेली आहे. हुंडा, महिलांची असुरक्षितता, विवाहातील खर्च, मालमत्तेतील भेदभाव आणि पुरुषप्रधान संस्कृती यामुळे मुलींच्या जन्माकडे आजही नकारात्मक नजरेने पाहिले जाते. संशोधनानुसार सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम वर्गातही लिंगनिवडीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही चिंताजनक आहे. एका बाजूला महिला सक्षमीकरणाच्या घोषणा दिल्या जातात; तर दुसरीकडे महिलाच असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलल्या जातात. बलात्कार, अत्याचार, विनयभंग, कौटुंबिक हिंसा या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. मुली सुरक्षित नसल्याची भावना पालकांमध्ये निर्माण होत आहे आणि त्यातून मुलगी नको ही मानसिकता बळावत आहे. ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.

सरकारची धोरणेही अनेकदा केवळ कागदावरच दिसतात. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'सारख्या मोहिमा जाहिरातीत दिसतात; मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत मोठी तफावत आहे. पीसीपीएनडीटी कायदा अस्तित्वात असूनही राज्यभरात बेकायदा सोनोग्राफी केंद्रे आणि गर्भलिंग निदान रॅकेट सुरू आहेत. अनेक डॉक्टरांवर कारवाई होते; पण दोषसिद्धीचे प्रमाण अत्यल्प आहे. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार देशभरात महिला भ्रूणहत्या प्रकरणांत कारवाया वाढल्या असल्या, तरी प्रत्यक्ष शिक्षा होणाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे.

श्रीरामपूर प्रकरणात तर आणखी धक्कादायक बाब समोर आली. गर्भलिंग निदानासाठी महिलांकडून पैसे घेण्याबरोबरच शरीरसुखाची मागणी केल्याचा आरोपही समोर येत आहे. म्हणजे स्त्रीला केवळ उपभोगाची वस्तू समजणारी मानसिकता किती खोलवर गेली आहे, याचे हे भयावह उदाहरण आहे. अशा घटना केवळ कायद्याने थांबणार नाहीत; त्यासाठी सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे. लिंग गुणोत्तर घटत राहिले तर भविष्यात सामाजिक असंतुलन निर्माण होईल. अनेक अभ्यासांमध्ये यामुळे विवाहसंस्था, गुन्हेगारी आणि मानवी तस्करी यांसारख्या समस्या वाढण्याचा इशारा देण्यात आला आहे. हरियाणा आणि पंजाबमध्ये निर्माण झालेली वधू टंचाई आता इतर राज्यांसाठीही धोक्याची घंटा आहे.

महाराष्ट्राने फुले–शाहू–आंबेडकरांचा वारसा सांगत स्वतःला पुरोगामी म्हणवून घेतले; पण जर गर्भातील मुलींचे प्राण पैशासाठी विकले जात असतील, तर हा पुरोगामित्वाचा मुखवटा फाटल्याशिवाय राहणार नाही. श्रीरामपूरमधील कारवाई ही स्वागतार्ह असली, तरी ती अंतिम लढाई नाही. अजून अनेक रॅकेट राज्यभर सक्रिय असल्याची शक्यता आहे.

समाज, सरकार, वैद्यकीय क्षेत्र आणि कुटुंब व्यवस्था यांनी मिळून या मानसिकतेविरुद्ध उभे राहिले नाही, तर भविष्यात मुलगी वाचवा ही घोषणा केवळ पोस्टरपुरती उरेल.कारण शेवटी प्रश्न फक्त गर्भातील मुलींचा नाही; प्रश्न आहे मानवतेचा संस्कृतीचा आणि समाजाच्या विवेकबुद्धीचा..!

# ग्रामीण भागातील तरुणांसाठी मार्गदर्शक बना : आ. अमोल खताळ

## पोलिस उपनिरीक्षक जावयाचा सासरवाडीत झाला सन्मान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : बिरेवाडीसारख्या अत्यंत ग्रामीण भागातील संतोष सागर यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करत पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. त्यांच्या या यशाबद्दल आमदार अमोल खताळ यांनी त्यांचे कौतुक करत, ग्रामीण भागातील होतकरू तरुणांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्याचे आवाहन केले. तसेच संतोष सागर यांनी याच पदावर न थांबता पुढील स्पर्धा परीक्षा देत उच्च पदावर झेप घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

**आज मला मिळालेले यश हे केवळ माझे नसून माझ्या कुटुंबाच्या पाठबळाचे फळ आहे. त्यांच्या विश्वास, त्याग आणि सततच्या प्रोत्साहनामुळेच मी या टप्प्यापर्यंत पोहोचू शकलो. माझी निवड झाल्यानंतर सर्वप्रथम माझा सन्मान सासरवाडीत झाला, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि भावनिक गोष्ट आहे. अशी साथ देणारी सासरवाडी मिळणे हे खरोखर भाग्याची बाब आहे. या सन्मानामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली असून, पुढील काळात आणखी मोठ्या पदावर पोहोचण्यासाठी मी निश्चितच प्रयत्नशील राहीन.**
**– संतोष सागर (पोलीस उपनिरीक्षक)**

संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील साकुरजवळील बिरेवाडी (ता. संगमनेर) येथील सुपुत्र संतोष शारदा सूर्यभान सागर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल धांदरफळ खुर्द येथील संपत खताळ परिवाराच्या वतीने सासरवाडीत त्यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी व्यासपीठावर सत्कारमूर्ती संतोष सागर यांची पत्नी प्रणिती सागर, आई शारदा सागर, सासरे संपत खताळ, अर्जुन महाराज खताळ, भाजप तालुका अध्यक्ष गुलाबराजे भोसले, शिवसेना उपतालुकाप्रमुख बादशाह गुंजाळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, सध्या राज्यात महायुती सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शासकीय नोकरभरती सुरू आहे आणि ही युवकांसाठी सुवर्णसंधी आहे. राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली भरती प्रक्रियेला वेग आला असून ग्रामीण भागातील तरुणांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.


## प्रशासनाने करुले गावचे पिण्याचे पाणी बंद केल्याने नागरिकांत संताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गेल्या दोन वर्षांपासून बंद असून, प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप करीत करुले गावातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. जलसंधारण विभागाने पालकमंत्री व नवीन लोकप्रतिनिधी यांच्या दबावातून गावाची पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन जाणीवपूर्वक बंद केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहेकरुले गावचे सरपंच बाळासाहेब आहेर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, योजना बंद असल्याने गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. भर उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. प्रशासनाला अनेकदा निवेदने दिली, मात्र कोणतीही कार्यवाही झाली नाहीनिळवंडे धरण व कालवे दुष्काळग्रस्त भागासाठी उभारण्यात आले, मात्र सध्या संगमनेर तालुक्यातील जनतेला पिण्याचे पाणीही मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. डाव्या कालव्यातून इतर भागात पाणी सोडले जात असताना करुले गाव मात्र तहानलेले आहे, असेही त्यांनी नमूद केले. या संदर्भात पालकमंत्री, खासदार, तहसीलदार, प्रांताधिकारी व गटविकास अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करण्यात आल्याचे सांगण्यात आले. तातडीने पाणीपुरवठा सुरू न झाल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, तसेच आत्मदहनाचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

## प्रतिम पारखे'' सायकॉलॉजी विषयात १०० मार्क्स मिळवून राज्यात प्रथम



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : रयत शिक्षण संस्थेचे रा. ब. ना. बोरावके महाविद्यालयातील इयत्ता बारावीतील विद्यार्थी कु.प्रतिम राजेश्वर पारखे या विद्यार्थ्याने ९४.१७% प्राप्त करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आणि सायकॉलॉजी या विषयात १०० पैकी १०० मार्क्स मिळवून महाराष्ट्र राज्यात या विषयात प्रथम क्रमांक मिळविला. त्याच्या या अद्वितीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने मॅडम यांनी विशेष सत्कारीत केले,या यशस्वी विद्यार्थ्यास प्राचार्य डॉ. बडधे ,उपप्राचार्य, कला विभाग प्रमुख (जुनियर विभाग) प्रा.पटेल, वर्गशिक्षक प्रा. बारस्कर, सायकॉलॉजी विषयाचे प्रा एस. टी. शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## हज यात्रेनिमित्त जेहूर शेख यांचा शिबलापूर ग्रामस्थांतर्फे सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील शिबलापूर येथील जेहूर शेख व त्यांच्या पत्नी ६ मे रोजी पवित्र हज यात्रेसाठी रवाना होत असून, त्यानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने शेख दाम्पत्याचा नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. जेहूर शेख हे डॉ. विखे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक असून सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करत ग्रामस्थांनी पुढील धार्मिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते आण्णासाहेब म्हस्के, शिबलापूर विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे अध्यक्ष अशोक वालझाडे, प्रकाश शिंदे, राजेंद्र जाधव, संपत नागरे, भानुदास शिंदे, भिमराज बोंद्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना जेहूर शेख भावूक झाले. गावाने दिलेले प्रेम व आदर हीच माझ्या कामाची खरी पावती आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमामुळे परिसरात आनंदाचे वातावरण होते.

# अशोक कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्याचा उद्योजकतेकडे यशस्वी प्रवास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपुर** : अशोक कॉलेज ऑफ फार्मसी येथील डी. फार्मसीच्या पहिल्या बॅचमधील विद्यार्थी प्रसाद विठ्ठल उंडे यांनी शिक्षण पूर्ण होताच श्रीकृष्णा मेडिकल या नावाने स्वतःचे मेडिकल स्टोअर सुरू करून उद्योजकतेचा आदर्श निर्माण केला आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन स्वबळावर उभे राहण्याचा त्यांचा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

लोकनेते माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली व मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत संस्थेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्ये, उद्योजकता व आत्मनिर्भरता विकसित करणे हा आहे. प्रसाद उंडे यांच्या यशामुळे संस्थेचा शिक्षणातून रोजगार, रोजगारातून समाजसेवा हा मूलमंत्र प्रत्यक्षात उतरल्याचे दिसून आले.

मातापूरसारख्या ग्रामीण भागात श्रीकृष्णा मेडिकल सुरू झाल्याने नागरिकांना आता स्थानिक पातळीवरच दर्जेदार व परवडणारी औषध सेवा उपलब्ध झाली आहे. यापूर्वी औषधांसाठी शहरात जावे लागत होते. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. उद्घाटन प्रसंगी अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी प्रसाद उंडे यांचे अभिनंदन केले.

## राहुरी तालुका वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड ज्ञानदेव तोडमल बिनविरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : राहुरी तालुका वकील संघाची सन २०२६–२७ साठी नुकतीच निवडणुक झाली. यामध्ये ॲड. ज्ञानदेव तोडमल यांची बिनविरोध निवड करण्यात आली. आणि उपाध्यक्षपदी ॲड प्रकाश संसारे यांची निवड घोषित करण्यात आले त्याचप्रमाणे महिला उपाध्यक्षपदी ॲड जयश्री दत्तात्रय घावटे यांची निवड झाली. तसेच वकील संघाच्या सचीव पदी ॲड शशीकांत देशमुख यांची बिनविरोध निवड झाली त्याचप्रमाणे सहसचिव म्हणुन ॲड राहुल दिवे, खजिनदार पदी ॲड असीफ शेख, सह खजिनदार पदी ॲड. दिपक सगळगिळे तसेच सदस्य म्हणुन ॲड विशाल फिलीफ संसारे, ॲड मनोज दत्तात्रय पारखे, ॲड नावेद बागवान, ॲड सुरेखा कुलकर्णी, ॲड विद्या अनाप, ॲड अनिता तोडमल यांची निवड झालेली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून वकील संघाचे जेष्ठ सदस्य ॲड बी. बी. उन्हे यांनी कामकाज पाहिले त्यांना ॲड. कल्याणी पागिरे यांनी सहकार्य केले.

या प्रसंगी माजी अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव व राहुरी तालुका वकील संघाचे सर्व जेष्ठ सदस्य व ज्युनियर सदस्यही उपस्थित होते. निवडीनंतर नुतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या सत्कार प्रसंगी नूतन अध्यक्ष ज्ञानदेव तोडमल यांनी राहुरी येथे जिल्हा व सत्र न्यायालय आणणेकामी, नुतन इमारत बांधण्यासाठी व वकीलांच्या प्रश्नासाठी विशेष प्राधान्य देणार असल्याचे सांगितले.

निवडणुक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नुतन पदाधिकाऱ्यांचे जेष्ठ सदस्य ॲड आर जे म्हसे, ॲड आर एम उंडे, माजी अध्यक्ष ॲड मोरे, ॲड नवले, ॲड आघाव, ॲड पवार ॲड देशमुख, ॲड भिंगारदे, ॲड रसाळ यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## प्रितीसुधाजींच्या स्मृती कायमस्वरूपी राहणार : लुक्कड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : सर्व समाजाला जैन धर्माच्या नवकार मंत्राच्या माध्यमातून सुसंस्कार घडवून गोमाता रक्षणाचा प्रसार व विस्तार करण्याचे काम जैन सांप्रदायातील राष्ट्रसंत आचार्यसम'ाट पू. आनंदऋषि महाराजांच्या अज्ञानुवर्तीनी साध्वी पु. वाणीभूषण प्रितीसुधाजींनी केली. त्यांची स्मृती कायमस्वरूपी घर करून राहणार असल्याचे जेष्ठ स्वाध्यायी शोभा छगनलाल लुक्कड यांनी केले. वाणीभूषण पू. प्रितीसुधाजी साध्वीजींचे १ मे रोजी पुणे येथे संथारा व'तात महानिर्वाण झाले. त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी श्रीरामपूरच्या जैन स्थानकामध्ये महावीर गाथा व चातुर्मास समिती व आदर्श जैन महिला मंडळ, बहु मंडळ व नवकार ग्'पच्या वतीने झालेल्या सभेत शोभा लुक्कड बोलत होत्या. यावेळी जेष्ठ पत्रकार रमेश कोठारी म्हणाले की, पू. प्रितीसुधा म. सा. यांचे श्रीरामपूरला अनेकवेळा पदस्पर्श होऊन प्रवचने झाली. त्या प्रवचनाच्या माध्यमातून वाणीभूषण साध्वी म्हणून सर्वत्र परिचित होत्या. त्यांनी प्रवचन व भावभक्तीपर गीतांनी समाजावर सुसंस्कार घडविले आहेत व अनेक साध्वींना दीक्षा दिली. त्यांची स्मृती सर्वांना कायम राहिल. त्यांना मोक्ष प्राप्ती भगवंतांनी द्यावी, अशी प्रार्थना केली.

याप्रसंगी ज्योती भळगट, मनसुखलाल चोरडीया यांनी मनोगतातून आदरांजली अर्पण केली. तर प्रविण चंगेडीया यांनी वाणीभूषण प्रितीसुधाजी रचित भावभक्तीपर गीत यावेळी म्हटले. याप्रसंगी पियुष दुधेडीया, सचिन गुंदेचा, अभय मुथ्था, प्रविण बोरा, रोहित भंडारी, विजय कोठारी, राजेंद्र भंडारी, पुष्पाबाई दुधेडीया, प्रमिला बाफना, चोरडीया, सरला गांधी, रुणवाल आदींसह जैन समाज उपस्थित होत.

# पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे ग्रामीण विकासाचे शिल्पकार : डॉ. निलेश बनकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी**, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले. सहकार, शेती, आरोग्य, शिक्षण आणि अर्थ क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे ते खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाचे शिल्पकार होते, असे प्रतिपादन यांनी केले. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, सहकार चळवळीच्या माध्यमातून डॉ. विखे पाटील यांनी शेतकऱ्यांना आर्थिक बळ दिले. शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, साखर कारखान्यांची उभारणी आणि विविध संस्थांच्या स्थापनेमुळे ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळाली. आरोग्य व शिक्षण क्षेत्रातही त्यांनी उभारलेल्या संस्थांमुळे सर्वसामान्यांना सुविधा उपलब्ध झाल्या. त्यांचे नेतृत्व बहुआयामी होते. विखे पाटील परिवाराने नेहमीच राजकीय हितापेक्षा समाजहिताला प्राधान्य देत गरजूंना मदतीचा हात दिला.



**पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ; उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.**

सेवा, ज्ञान आणि आरोग्य या क्षेत्रांतील त्यांचा वारसा आजही अखंड सुरू आहे. यावेळी पायरेन्स आय.बी.एम.ए.चे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी मनोगत व्यक्त करताना नदीजोड प्रकल्पाबाबत डॉ. विखे पाटील यांची आग्रही भूमिका अधोरेखित केली. देशात काही भागात पूरस्थिती तर काही भागात दुष्काळ अशी विषमता असल्याने नदीजोड प्रकल्पामुळे पाण्याचे समतोल वितरण होऊन शेती व पिण्याच्या पाण्याच्या समस्यांवर तोडगा निघू शकतो, असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी पायरेन्स आयबीएमए तसेच डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या प्राचार्या डॉ. कल्पना साठे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विविध अभ्यासक्रमांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृती शेलार तर आभार प्रतीक्षा पुलाटे यांनी मानले.

# आमदार आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्याला यश

## श्रीरामपूर येथे मिळणार वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील दिव्यांग बांधवांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय आरोग्य विभागाने घेतला असून, आमदार आशुतोष काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत पुढील महिन्यापासून दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी श्रीरामपूर येथे वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार आहे. यामुळे कोपरगावसह इतर चार तालुक्यांतील दिव्यांग नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मतदारसंघातील दिव्यांगांना प्रमाणपत्रासाठी दूरवर जावे लागू नये, यासाठी आमदार काळे यांनी २०१९ पासून विशेष उपक्रम सुरू केला होता.

दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी कोपरगाव येथून जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच संपर्क कार्यालयामार्फत दिव्यांगांना आवश्यक मदतही करण्यात येत होती. या उपक्रमातून आतापर्यंत सुमारे दीड हजारांहून अधिक दिव्यांगांना प्रमाणपत्र मिळवून देण्यात यश आले आहे. अहिल्यानगर जिल्हा रुग्णालय कोपरगावसह उत्तर भागातील तालुक्यांपासून दूर असल्याने दिव्यांग व त्यांच्या पालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही अडचण लक्षात घेऊन श्रीरामपूर, शिर्डी व राहाता परिसरातच तपासणी व प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी आमदार काळे यांनी आरोग्य विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.



**मतदारसंघातील एकही दिव्यांग व्यक्ती शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नये, हा माझा प्रयत्न आहे. दिव्यांगांना प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रवासाचा निम्मा त्रास कमी करण्यात यश आले असून, कोपरगाव उपजिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण झाल्यानंतर येत्या काही महिन्यांत तेथेच ही सुविधा उपलब्ध करून देणार आहोत, असे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले.**

==================================

अखेर या प्रयत्नांना यश आले असून, आता श्रीरामपूर येथील उपजिल्हा रुग्णालयस्तरीय ग्रामीण रुग्णालयात तपासणी करून वैश्विक दिव्यांग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या निर्णयामुळे अकोले, संगमनेर, राहाता, कोपरगाव व श्रीरामपूर तालुक्यातील दिव्यांग नागरिकांचा प्रवासाचा त्रास जवळपास निम्म्याने कमी होणार असून वेळेचीही बचत होणार आहे.

या निर्णयाबद्दल आमदार काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### द्रोणाची इयत्ता बारावीच्या निकालाची परंपरा कायम

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा अकॅडमीतील इयत्ता बारावीचा शंभर टक्के निकाल. कॉलेज ने या ही वर्षी इयत्ता बारावीच्या १००% निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण होऊन कॉलेजचा गौरव वाढवला आहे. यंदा विज्ञान व वाणिज्य शाखांमधील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. अनेक विद्यार्थ्यांनी उच्चश्रेणी मिळवून विशेष प्राविण्य संपादन केले आहे. यामागे विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे. संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक, शिक्षिका यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या उज्वल भविष्य साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### रोहिणी पवार यांचा स्टार ग्लोबल सोशल अवॉर्ड पुरस्काराने सन्मान



**शिर्डी** : अहिल्यानगर रणरागिणी फौंडेशनच्या कार्यकर्त्या रोहिणी पवार यांना कला संस्कृति व सामाजिक कार्यात उत्कृष्ठ कामगिरी बद्दल स्टार ग्लोबल सोशल अवॉर्ड पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. स्टार ग्लोबल कॉन्फरन्स अँड अवॉर्ड सेरेमनी. या कार्यक्रमात स्टार ग्लोबल पुरस्कार वितरण करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ सुनील गायकवाड माजी खासदार लातूर, दिलीप घेवंडे जेष्ठ अभिनेते, लीना पंडित सुप्रसिद्ध अभिनेत्री, कृष्णकुमार दडके संमेलनाध्यक्ष समाजसेवक, रमेश अग्रवाल सुप्रसिद्ध अभिनेता, डॉ. मंगल पांचाळ ज्येष्ठ साहित्यिक उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्वागत अध्यक्ष व आयोजक प्रा. डॉ.बी. एन. खरात समृध्दी पब्लिकेशन आदी उपस्थित मान्यवर होते. यावेळी भरत विलास गर्जे महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार देण्यात आला. रणरागिणी फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष रोहिणीताई पवार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश कारेकर यांनी तर डॉ बी एन खरात यांनी आभार प्रदर्शन केले.

### मियासाहेब पादुकांच्या यात्रेचे ८ मे रोजी आयोजन



**राहुरी** : तालुक्यातील टाकळीमिया गावचे ग्रामदैवत व सर्व धर्मियाचे श्रद्धास्थान मियासाहेब बाबांच्या पादुकांची दरवर्षी प्रमाणे यात्रा शुक्रवार दि. ८ मे रोजी भरणार असल्याची माहिती देवस्थानचे पुजारी अमीर इनामदार यांनी दिली गुरुवार दि. ७ मे २०२६ रोजी सकाळी गंगेहून आणलेल्या पवित्र जलाने बाबांच्या पादुकांना जलाभिषेक होणार असून रात्री संदलाची मिरवणूक निघून पादुकांना संदल व फुलांची चादर चढवली जाणार आहे. शुक्रवारी भाविकभक्तांनी केलेल्या नवसाची पूर्ती केली जाणार आहे. त्या रात्री शोभेच्या दारूची आतषबाजी केली जाणार आहे. यावर्षी शनिवारी बैलगाडी शर्यत व कुस्त्याचा हगामा भरणार नसल्याचे सांगून यात्रेचा आनंद घेत असताना शांतता राखून सहकार्य करण्याचे आवाहन अमीर इनामदार यांनी केले आहे.

### राहुरी महाविद्यालयाची अनुष्का सरोदे अर्थशास्त्र विषयात बोर्डात झळकली



**राहुरी** : पुणे बोर्डाने नुकताच बारावीचा निकाल जाहीर केला आहे. त्यामध्ये लोकनेते रामदास पाटील धुमाळ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेची अनुष्का प्रवीण सरोदे ही पुणे बोर्डामध्ये अर्थशास्त्र या विषयामध्ये ९९ गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तिने राहुरी तालुक्याचे नाव पुणे बोर्डामध्ये झळकवले आहे. राहुरी महाविद्यालयाचा एकूण निकाल ८५.९०% लागला असून, त्यामध्ये कला शाखा ५७.४५%, विज्ञान शाखा ९१.४५% आणि वाणिज्य शाखा ८८.२३% लागली आहे. यामध्ये कला शाखेतून येवले आज्ञा दीपक ७३.३३% मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. वाणिज्य शाखेतून सरोदे अनुष्का प्रवीण ८८% तर विज्ञान शाखेतून लांडगे रोहित शिवाजी ८३.३% गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. अर्थशास्त्र या विषयामध्ये अनुष्का हिने ९९ गुण मिळवले असून पुणे बोर्डमध्ये राहुरी महाविद्यालयाच्या नावाचा दबदबा निर्माण केला आहे. तिला अर्थशास्त्र विभागाचे प्रा. संदीप पेरणे यांचे मार्गदर्शन लाभले. बागल श्रेया सुनील आणि कुमारी सय्यद नाज इजाज या दोन्ही विद्यार्थिनींनी डेअरी सायन्स मधून २०० पैकी २०० गुण मिळवून राहुरी महाविद्यालयाचे नाव महाराष्ट्रात झळकावले आहे.

# थोरात यांना राज्यस्तरीय तिफन गौरव पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगावचे भूमीपुत्र व महाराष्ट्र शासनाच्या कृषी खात्यात सेवेत असलेले कृषी अधिकारी अभय मच्छिंद्र थोरात यांचा नुकताच तिफन कृषी गौरव पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. कृषी खात्यात उत्कृष्ट अधिकारी-कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिस हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

अभय थोरात यांनी कृषी खात्यातील सेवेच्या माध्यमातून कृषी विस्तार, फलोत्पादन, जलसंधारण, गुणनियंत्रण, मधुमक्षिका पालन आदी क्षेत्रात उल्लेखनिय व नाविन्यपूर्ण काम केले. त्यांच्या कामाचा आवाका, दर्जा, सातत्य आणि वैविध्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली.

राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, कृषी आयुक्त, कृषी संचालक तसेच तिफन फाउंडेशनचे जमदाडे यांच्या उपस्थितीत कृषी आयुक्तालय, पुणे येथे समारंभपूर्वक थोरात यांना या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अभय थोरात यांना प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून उक्कलगाव ग्रामस्थांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

माजी सभापती व देखरेख संघाचे अध्यक्ष इंद्रनाथ पा. थोरात यांचे ते पुतणे आहेत. मला मिळालेला हा पुरस्कार ग्रामीण मातीचा गौरव असून शेतीची पिढीजात आवड असल्याने मला मिळालेला पुरस्कार हे त्याचेच फलित आहे, अशी प्रतिक्रिया पुरस्कार स्विकारल्यानंतर दिली

# बेकायदा वाळू वाहतुकीमुळे पुणतांबा परिसरातील रस्त्यांची दुरवस्था

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणतांबा** : गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या बेकायदा वाळू उपशामुळे पुणतांबा परिसरातील रस्त्यांची अक्षरशः वाट लागली असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अवजड डंपर व ट्रॅक्टरच्या रात्रंदिवस सुरू असलेल्या वाहतुकीमुळे रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा करून विविध ठिकाणी साठाही करण्यात येत आहे. त्यानंतर वाळू, मुरूम व माती भरलेली वाहने पुणतांबा-जळगाव, पुणतांबा-बाकडी तसेच पुणतांबा-शिर्डी मार्गावरून सतत ये-जा करत आहेत. विशेषत: रात्रीच्या वेळी भरधाव वेगाने धावणाऱ्या अवजड वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढला असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

सततच्या वाहतुकीमुळे रस्त्यांवर खड्डे पडले असून सामान्य नागरिक, शेतकरी व विद्यार्थी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पुणतांबा गाव राहाता तालुक्यात असले तरी मतदारसंघ कोपरगाव मध्ये येतो. या भागाला एक कॅबिनेट मंत्री व दोन आमदारांचे प्रतिनिधित्व लाभले असून त्यांनी ठोस भूमिका घेतल्यास बेकायदा वाळू उपसा तात्काळ बंद होऊ शकतो, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गोदावरी नदीपात्रातून १९८० पासून बेकायदा वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

अनियंत्रित वाळू उपशामुळे भविष्यात पाण्याअभावी पुणतांबा परिसर वाळवंट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नदीपात्रातील बेकायदा वाळू उपसा तातडीने थांबवून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

## छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या एच.एस.सी. निकालाची परंपरा कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव-कोळपेवाडी येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने एच.एस.सी. निकालाची परंपरा कायम राखली असून यावर्षी निकालात चारही शाखांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. ज्युनिअर कॉलेजचा एकूण निकाल ९१.४०% लागला आहे. यामध्ये वाणिज्य शाखेचा शेकडा निकाल ९७.८७%, विज्ञान शाखेचा शेकडा निकाल ९२.३०% तर कला शाखेचा शेकडा निकाल ८४.६१% एवढा लागला असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य प्रकाश चौरे यांनी दिली आहे. वाणिज्य शाखेत कु. सायली राजेंद्र भुसे हिने ७८.५०% गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या कृष्णा रमेश धसे याने ७३.३३% गुण मिळविले आहे. तर कु. सायली नवनाथ शेजवळ हिने ७२.१७ % गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. कला शाखेत मोरे साईनाथ ज्ञानेश्वर विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक ७५.३३% गुण मिळवत प्रथम क्रमांक, शेख असिफ राजू या विद्यार्थ्याने ७३.१७ गुण मिळवत द्वितीय तर शेळके सारंग अरुण या विद्यार्थ्याने ६८.६७% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. विज्ञान शाखेत गावंडे यश अजय या विद्यार्थ्याने ७१.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक, गायकवाड अभिषेक बापूसाहेब ६३.६७% गुण मिळवून द्वितीय तर हम्जा हुसेन सय्यद या विद्यार्थिनीने ६३.००%गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. किमान कौशल्य विभागात तूपसैंदर सौरभ अनिल या विद्यार्थ्याने ६१.७०% गुण मिळवत प्रथम क्रमांक, गावित्रे सनी सुभाष या विद्यार्थ्याने ६१.२०% गुण मिळवून द्वितीय तर तर ब्राम्हणे सचिन सोमनाथ याने ६०.००% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षकांचे मा.आ.अशोकराव काळे, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अध्यक्ष आ.आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष,सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन व विकास समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष व सर्व सदस्य,माता पालक संघ, शिक्षक पालक संघ व सर्व समित्यांचे अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्य तसेच पंचक्रोशीतील सर्व शिक्षणप्रेमी पालक, ग्रामस्थ यांनी देखील अभिनंदन केले आहे.

# आश्वी पंचक्रोशीत चोऱ्यांचा धुमाकूळ

## बिबट्याच्या दहशतीने नागरिक रस्त्यावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या चोऱ्यांच्या सत्राने कळस गाठला असून, संपूर्ण पंचक्रोशी दहशतीच्या छायेत आहे. उंबरी, आश्वी बु. दाढ खु।। आणि चिंचपूर येथील घरफोड्यांनी नागरिक हवालदिल असतानाच, खळी येथे ग्रामस्थांनी एका संशयित इसमाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

या संशयिताने पोलिसांकडे काय गौप्यस्फोट केले, हे जाणून घेण्यासाठी जनतेमध्ये प्रचंड उत्सुकता आणि संताप असून पोलिसांनी ही माहिती तातडीने जाहीर करण्याची मागणी होत आहे. या परिसरातील सुरक्षेचा प्रश्न गंभीर होण्यास स्थानिक घरमालकही तितकेच जबाबदार असल्याचे समोर येत आहे. गावात सौर प्रकल्प, महामार्ग आणि इमारत बांधकामासाठी उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड या राज्यांतून हजारो मजूर आले आहेत.

हे मजूर ज्यांच्या घरात भाड्याने राहतात, त्या घरमालकांकडे त्यांची कोणतीही अधिकृत नोंद, आधार कार्ड किंवा पोलीस पडताळणी नाही. केवळ भाड्याच्या पैशांसाठी अनोळखी व्यक्तींना थारा देणाऱ्या घरमालकांमुळेच गुन्हेगारांचे फावत आहे.

अशा निष्काळजी घरमालकांवर पोलिसांनी तातडीने कठोर 'ॲक्शन' घ्यावी आणि त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### फेरीवाल्यांना 'पोलीस ओळखपत्र' बंधनकारक करा!

गावोगावी फिरणारे अनोळखी फेरीवाले आणि भंगार गोळा करणाऱ्यांमुळे संशयाचे वातावरण आहे. नागरिकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की: प्रत्येक फेरीवाल्याची आणि बाहेरील मजुराची पोलीस पडताळणी करून त्यांना प्रशासनाकडून फोटोसह 'पोलीस ओळखपत्र' दिले जावे. ज्यांच्याकडे अधिकृत ओळखपत्र नाही, त्यांना गावात प्रवेश दिला जाणार नाही, असे फलक ग्रामपंचायतींनी लावावेत.

### ३० हून अधिक गावांमध्ये 'रात्रवैरी' बिबट्या अन् चोर

आश्वी खुर्द, आश्वी बु., खळी, शिबलापूर, पानोडी, वरवंडी, खरशिंदे, चौधरवाडी, कुंभारवाडी, खांबे, पिंप्री लौकी, अजामपूर, दाढ खुर्द, चनेगाव, झरेकाठी, हनुमानवाडी, शेडगाव, माळेवाडी, हंगेवाडी, कनोली, कनकापूर, ओझर बु., ओझर खुर्द, उंबरी, बाळापूर, मनोली, रहीमपूर, प्रतापपूर, चिंचपूर, निमगावजाळी, सादतपूर आणि औरंगपूर या गावांमध्ये सध्या भयाण शांतता असून, नागरिक लाठ्या-काठ्या घेऊन रात्रभर पहारा देत आहेत. दाट बागायती क्षेत्रामुळे बिबट्याचा वावर आणि त्यातच घिरट्या घालणारे 'गूढ ड्रोन' यामुळे महिला आणि बालकांमध्ये घबराट पसरली आहे. खळी येथे पकडलेल्या संशयिताच्या मुळाशी जाऊन पोलिसांनी आंतरराज्य टोळीचा छडा लावावा. तसेच अनधिकृत दारू अड्डे आणि वाळू तस्करीवर प्रहार करून परिसरात शांतता प्रस्थापित करावी.

### प्रशासन आता तरी जागे होणार का?

आमच्या जिवाची शाश्वती राहिलेली नाही. चोरांसोबतच आता माहिती न ठेवणाऱ्या घरमालकांवरही कारवाई झाली पाहिजे. पोलीस गस्त न वाढल्यास आणि बाहेरील लोकांची नोंदणी न झाल्यास संपूर्ण आश्वी पंचक्रोशीतील जनता पोलीस ठाण्यावर धडक मोर्चा काढेल!

**संतप्त नागरिक, आश्वी पंचक्रोशी.**

# बुलढाणा अर्बन बँकेच्या मयत कर्जदार सभासदाच्या वारसास विमा धनादेश वितरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : सहकाराची समृद्ध परंपरा जपत सामाजिक कार्याची जोड देत ग्राहक, लघुउद्योजक व शेतकरी सभासदांच्या हितासाठी आर्थिक व सोशल बँकिंग राबविणाऱ्या आणि आशिया खंडातील अग्रगण्य संस्था म्हणून नावलौकिक मिळवलेल्या बुलढाणा अर्बन संस्थेच्या नेवासा शाखेच्या वतीने मयत कर्जदार सभासदाच्या वारसास विमा धनादेशाचे वितरण करण्यात आले. नेवासा शाखा कार्यक्षेत्रातील भानसहिवरा येथील रहिवासी व संस्थेचे सभासद स्व. राजेंद्र गंगाधर भोईटे यांनी दि. १५ एप्रिल २०२५ रोजी शाखा नेवासा येथून सोनेतारण कर्ज म्हणून रुपये १ लाख ४५ हजार घेतले होते.

दरम्यान, दि. १० जानेवारी २०२६ रोजी त्यांचा अपघाती मृत्यू झाला. संस्थेच्या योजनेनुसार ठेवीदारास ठेवीएवढे तर कर्जदारास कर्जरकमेएवढे अपघाती विमा संरक्षण देण्यात येते. सदर घटनेची माहिती मिळताच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक (भाईजी), अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर व सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्या आदेशानुसार तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय व्यवस्थापक रमेश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा व्यवस्थापक ईश्वर काकडे यांनी भोईटे यांच्या घरी भेट देऊन परिवाराचे सांत्वन केले. तसेच अपघाती विमा योजनेबाबत आवश्यक माहिती दिली. यानंतर भोईटे कुटुंबीयांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून विमा प्रस्ताव मुख्यालयाकडे सादर करण्यात आला.

या योजनेअंतर्गत आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनीने मयत कर्जदार स्व. राजेंद्र गंगाधर भोईटे यांच्या कर्जाच्या व्याजासह पूर्ण रकमेचा रुपये १ लाख ६१ हजार ७२० इतका क्लेम मंजूर केला. दि. ५ मे २०२६ रोजी मयत खातेदार सभासद यांच्या वारसदार सविताबाई राजेंद्र भोईटे यांना सोनेतारण कर्ज खात्यातील सोने व संबंधित वस्तू प्रतिष्ठित सभासद डॉ. रोहित पाटील, राजेंद्र वाघमारे, सोपान गुंजाळ, विजय धनाळे, किरण गरड व संतोष उंडे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी शाखा व्यवस्थापक ईश्वर काकडे तसेच शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# सफाई कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार : शेरसिंग डागोर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर पालिकेतील सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, असे आश्वासन महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिल्याची माहिती नगरसेविका प्रणिती दिपक चव्हाण यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, पुनर्वसन, आरोग्य व सामाजिक सुरक्षेसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, विविध नगरपालिकांचे मुख्याधिकारी तसेच सफाई कामगार प्रतिनिधी उपस्थित होते. अध्यक्ष डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे.

त्या प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. कामगारांना सुरक्षित व सन्मानजनक वातावरण, नियमित आरोग्य तपासणी, विमा संरक्षण, पाल्यांच्या शिक्षणासाठी सुविधा तसेच कौशल्य विकासाद्वारे पर्यायी रोजगार उपलब्ध करून द्यावा. लाड समितीच्या शिफारशीप्रमाणे वारसांना तातडीने नियुक्ती द्यावी. किमान वेतन वेळेत मिळेल याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. सफाई कामगार हे नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणारे फ्रंटलाइन सैनिक असल्याचे सांगत, त्यांच्या प्रश्नांवर सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# पद्मश्री डॉ. विखे पाटील सैनिक स्कूलमध्ये माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**लोणी** : शाळेतील गंमती-जंमती, जुन्या आठवणी आणि शालेय जीवनात मिळालेल्या संस्कारांना उजाळा देत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विखे पाटील सैनिक स्कूलमध्ये आयोजित माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला. संस्थेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००५ ते २०२० या कालावधीतील विविध बॅचचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सैन्यदलात कार्यरत तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे माजी विद्यार्थी या मेळाव्यात सहभागी झाले होते, अशी माहिती प्राचार्य राजेश माघाडे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त शिक्षण संचालक डी. एस. निबे होते. माजी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विशाल कांबळे उपस्थित होते. यावेळी माजी प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचीही विशेष उपस्थिती लाभली. भारतीय वायुदलातून निवृत्त झालेले राहुल पुजारी व साईनाथ घोडेचोर यांचा शाळेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यांनी शाळेत मिळालेल्या शिस्तीचे, व्यायामाचे व वेळेच्या महत्त्वाचे अनुभव मांडले. प्रा. सुजित वाघ यांनी आपल्या खुमासदार शैलीत शालेय आठवणींना उजाळा देत उपस्थितांना हसवले व भावूकही केले. इतर माजी विद्यार्थ्यांनीही सैनिक स्कूलमधील शिस्त आणि क्रीडा प्रशिक्षणामुळे जीवनात मोठा फायदा झाल्याचे नमूद केले. माजी विद्यार्थी प्रतिनिधी विशाल कांबळे यांनी भविष्यात शाळेसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

अधिकाधिक विद्यार्थ्यांनी एन.डी.ए. मध्ये प्रवेश मिळवावा यासाठी मार्गदर्शनाची गरज त्यांनी अधोरेखित केली. कमांडंट कर्नल सुभाष घोडगेरी यांनी प्रास्ताविकात सर्वांचे स्वागत केले व संरक्षण दलात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला. अध्यक्षीय समारोपात डी. एस. निबे यांनी शाळेने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती व मूल्यशिक्षण रुजवून उत्तम नागरिक घडवले, याचा अभिमान व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलिमा पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर ठुबे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध मान्यवर व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यू/एसआर/९०/२०२६
नेवासा दिनांक. २७/०४/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-रजियाबानो कैसरखान पठाण, अकोला, ता.अकोला यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. रजियाबानो कैसरखान पठाण रा. नेवासा बु.नेवासे यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-रजियाबानो कैसरखान पठाण, गावाचे नाव-नेवासा बु, जन्म दिनांक-२७/१२/१९७१

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यू/एसआर/९१/२०२६
नेवासा दिनांक. २७/०४/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-मेहताब बापूसाहेब शेख, नेवासा खुर्द, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शमीम कैसरखान पठाण रा. करजगाव यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-शमीम कैसरखान पठाण, गावाचे नाव-करजगाव, जन्म दिनांक-२३/०६/१९६७

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

## गर्भलिंग निदान गर्भपात रॅकेटचा भांडाफोड

करणारे डॉक्टर, एजंट, दलाल तसेच संबंधित म हिलांच्या कुटुंबीयांवर एवढ्या मोठ्या प्रमाणात एकाचवेळी कारवाई झाल्याची ही कदाचित राज्यातील पहिलीच घटना मानली जात आहे.

।दरम्यान, नव्याने अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना राहता न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपअधीक्षक जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे, पोलीस उपनिरीक्षक आशिष चौधरी आणि त्यांच्या पथकाने केली.

....

## साई रिसॉर्टप्रकरणात अनिल परब निर्दोष

सादर केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. मात्र, सुनावणीदरम्यान न्यायालयाने जमीन आणि बांधकाम हे स्वतंत्र घटक असल्याचे निरीक्षण नोंदवत पुराव्यांच्या आधारे सर्व आरोप सिद्ध होत नाहीत, असा निष्कर्ष काढला. त्यामुळे सर्व आरोपींना निर्दोष ठरवत न्यायालयाने त्यांची मुक्तता केली. त्यानंतर, अनिल परब यांचे साई रिसॉर्ट प्रकरण बाहेर काढणारे आणि न्यायालयात दावा करणारे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी प्रतिक्रिया देणे टाळले.

विशेष म्हणजे अंमलबजावणी संचालनालयाने दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात आरोपपत्र सादर केले, तेव्हा माजी मंत्री अनिल परब यांचा उल्लेखही त्यात नव्हता. ईडीने आणि विरोधकांनी अनिल परब यांच्यावर बेकायदेशीर बांधकाम केल्याचा आरोप केला होता. पण, ज्याप्रमाणे आरोप केले जात होते, त्याप्रमाणे तपासात परब यांचा सहभाग आढळला नाही किंवा त्यांच्याविरोधात काही पुरावे सापडले नाहीत का? असा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यातच, आता न्यायालयानेही अनिल परब यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

# प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी काम करा : जिल्हाधिकारी विनय गौडा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** सध्या सुरु असलेली जनगणना व मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) ही सरकारची महत्वाकांक्षी कामे आगामी दृष्टीने महत्वाची असून ही कामे अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घ्यावीत तसेच घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना वाळू मिळावी यासाठी वाळूचे घाट निश्चित करा, तालुकास्तरीय अधिकारी व ग्राम स्तरीय अधिकाऱ्यांनी नागरिकांना गावात भेटण्यासाठी आठवड्यातील दोन तीन दिवस निश्चित करून त्याचे वेळापत्रक आपल्या कार्यालयातील दर्शनी भागात लावावे असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नसल्याचे संकेत दिले. समाधानकारक उत्तरे न देणाऱ्या अधिकाऱ्यांची त्यांनी चांगलीच हजेरी घेतली. प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी काम करा अशी सूचना गौडा यांनी केली.

बैठकीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनीही कामांचा आढावा घेत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. बैठकीला उपविभागीय अधिकारी एकनाथ बंगाळ, तहसीलदार सुनील सावंत, गट विकास अधिकारी रावसाहेब चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख, मंडळ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत तहसीलदार सुनील सावंत यांनी महसूल विभागासह विविध कामांची स्थिती स्लाईडच्या माध्यमातून सादर केली. जिल्हाधिकारी यांनी पाणीपुरवठा, दहा हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या जमिनीच्या नोंदी, गायरान जमिनी, सरकारी जमीन, वर्ग दोनच्या जमिनी, जनगणना, विशेष सखोल पुनरावलोकन, घरकुलसाठी वाळू घाट निश्चित करणे, आपले सरकार वरील तक्रारी, अवैध वाळू उपसा रोखणे,२०११ पूर्वीचे अतिक्रमण याबाबत आढावा घेऊन कामाची गती वाढवण्याचे निर्देश दिले.

### जनता दरबारसाठी नागरिकांचा आक्रोश

विविध समस्या व प्रलंबित कामांचे निराकरण करण्यासाठी आयोजित जनता दरबार होत नसल्याने नागरिकांनी चांगलाच आक्रोश केला. आढावा बैठक झाल्यानंतर जिल्हाधिकारी विनय गौडा यांना मंत्रालयीन व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी) असल्याने ते तात्काळ गट विकास अधिकारी यांच्या कक्षात गेले व त्या ठिकाणी एक एक अर्ज स्वीकारून नागरिकांचे प्रश्न निकालात काढण्याचे साधारण नियोजन होते. मात्र, यावेळी संतापलेल्या नागरिकांनी बीडीओ कक्षासमोरच जमा होऊन घोषणाबाजी करत गोंधळ घातला. यावेळी पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले व शिऊर पोलीस ठाण्याचे एपीआय वैभव रणखांब यांनी गर्दी नियंत्रित करून नागरिकांना सभागृहात थांबण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी




मिन्नू पी. एम. यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी दामोधर पारिक, निवृत्ती सोनवणे, मनोज नळे, राम पिलदे, आदिसह अनेक नागरिकांनी समस्या मांडल्या व निवेदन सादर केले.

## 'त्या' नराधमाला फाशी द्या : पोलीस व तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे एका चार वर्षीय निष्पाप बालिकेवर अत्याचार करून तिचा जीव घेणाऱ्या नराधमास शासनाने त्वरित फाशीवर लटकावे व फास्टट्रॅक कोर्टात खटला दाखल करून लवकरात लवकर या मानवातील पशु असलेल्या नराधमास त्वरित फाशी द्या. या खटल्यासाठी विशेष सरकारी तज्ञ वकील कायदे तज्ञ यांची नियुक्ती करून हा खटला त्वरित निकाली काढून त्या नराधमाला फासावर लटकावे व त्या नराधमाचे वकीलपत्र कोणीही घेऊ नये व या खटल्यास कोणीही पाठीशी घालू नये. अशा संतप्त भावना या निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे. व सर्व सामान्य जनतेच्या भावना प्रशासनापर्यंत पोहोचवाव्या.

सरकारने लवकरात लवकर या नराधमास फासावर लटकावे अन्यथा त्या नराधमाला जनतेच्या हवाली करा अशा आशयाचे निवेदन राहुरी शहरातील ब्राह्मण संघटना व शहरातील नागरिक यांनी संघटित होऊन संतप्त भावनेने राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व तहसीलदार डॉ. अमित पवार यांना निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनावर शिरीष गुणे, अनिल देशपांडे, संजय कुलकर्णी, सुनील जोशी, अनिरुद्ध कुलकर्णी, पुष्कर कुलकर्णी, कृष्णा कुलकर्णी, दिलीप कुलकर्णी, सुनील दायमा, नितीन सातभाई, राजेंद्र देशपांडे, सुरेश क्षिरसागर, धनंजय पुरोहित, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, ऋषिकेश कुलकर्णी, विकास देशपांडे आदींच्या या निवेदनावर सहा आहेत.

## विद्यापीठाचे तंत्रज्ञान बांधापर्यंत पोहोचवण्यासाठी विस्तार पद्धतींचा वापर करा : डॉ. विलास खर्चे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** विद्यापीठातील संशोधनाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. आगामी काळात शेतीसमोर अनेक आव्हाने उभी राहणार असून संतुलित खतांचा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. याबाबत जनजागृती करण्यासाठी विद्यापीठामार्फत संतुलित खत वापर जागरूकता अभियान–२०२६ राबविण्यात येत आहे. विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवण्यासाठी शास्त्रज्ञांनी नाविन्यपूर्ण विस्तार पद्धतींचा अवलंब करावा, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. धुळे येथील शासकीय कृषी महाविद्यालय येथे भेटीदरम्यान आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, मुक्ताईनगर येथील कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. राहुल देसले, प्राध्यापक डॉ. विश्वनाथ शिंदे व प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दिनेश नांद्रे उपस्थित होते. डॉ. खर्चे पुढे म्हणाले की, हवामान अनुकूल शेती, नैसर्गिक शेतीचा प्रसार तसेच एकात्मिक शेती पद्धतीवर भर देण्याची गरज आहे. ग्रामीण युवकांना शेतीकडे वळवण्यासाठी कृषी उद्योजकता विकास, शेतकरी उत्पादक कंपन्यांना तांत्रिक पाठबळ आणि फुले समृद्धी गाव संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संतुलित खत वापर जागरूकता अभियान–२०२६ या भित्तीपत्रिकेचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. कुलगुरूंनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधन व विस्तार कार्याचा आढावा घेत विविध विभागांना भेटी देत मार्गदर्शन केले. तसेच बाजरी संशोधन केंद्र व कृषी विज्ञान केंद्रालाही भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. इल्हे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राहुल देसले यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन डॉ. जगदिश काथपुरी यांनी केले, तर आभार डॉ. विकास पवार यांनी मानले. कार्यक्रमास विभाग प्रमुख, प्रकल्प समन्वयक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## निधन वार्ता

### सुमनबाई फरगडे



**वडाळा महादेव :**श्रीरामपूर तालुक्यातील गोंधवणी येथील सुमनबाई भाऊसाहेब फरगडे (वय ६९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा एक, मुली तीन, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. येथील प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब फरगडे यांच्या त्या पत्नी तर सचिन फरगडे आर्ट ऑफ लिविंगच्या साधक मनीषा फरगडे यांच्या त्या मातोश्री होत.

### आनंदा भोसले



**श्रीरामपूर,** येथील रेल्वे स्थानकचे सेवानिवृत्त प्रबंधक आनंदा (आण्णासाहेब) नानाजी भोसले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ भाऊ, २ मुले, १ मुलगी, सुना, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते न्यायाधिश मिलिंद भोसले व फियाट कंपनीचे जनरल मॅनेजर गौतम भोसले यांचे वडील तसेच सोन्याबापु भोसले, रतनराव व सुनील भोसले यांचे थोरले बंधु, ॲड. रवींद्र भोसले, राहुल, प्रशांत व सिद्धार्थ भोसले यांचे ते चुलते होत.

### शांतवण दुशिंग



**वडाळा महादेव :** राऊत वस्ती येथील शांतपणे लहुजी दुशिंग वय ६४ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा एक मुलगी एक मेहुणे असा मोठा परिवार आहे. येथील समाज कल्याण विभागातील गणेश दुशिंग यांचे ते वडील होत.

## वाहन नोंदणीत दिरंगाई करणाऱ्या शोरूमला ग्राहक आयोगाकडून तीस हजाराचा दंड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्हा ग्राहक आयोगाने वाहन नोंदणीत दिरंगाई करणाऱ्या दोन मोटर्स शोरूमला दणका दिला आहे. तक्रारदार निलेश पाटील यांना ३० हजार रुपयांची भरपाई आणि ३० दिवसांत आरटीओ पासिंग करून देण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत.

याबाबत ॲड. किरण जहऱ्हाड यांनी पत्रकात म्हटले, की तक्रारदार श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथील निलेश पाटील यांनी टाकळीभान येथील राधिका मोटर्स व राहाता येथील गांधी मोटर्स यांच्याकडून टी.व्ही.एस कंपनीची ज्युपिटर झेड एक्स डीआयएससी एसएक्ससी खरेदी केली. परंतु शोरुमने गाडीचे पासिंग करून दिलेले नव्हते, म्हणून पाटील यांनी अहमदनगर येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रार अर्जाची दखल घेऊन आयोगाने खालीलप्रमाणे आदेश दिला. दोन्ही शोरुमने तक्रारदाराच्या वाहनाची नोंदणी करून घ्यावी व त्यासाठी लागणारा खर्च सामनेवाले शोरूमने करावा. तसेच शोरुमने तक्रारदार यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासापोटी २० हजार व तक्रारीचा खर्च १०हजार द्यावेत. तक्रारदाराच्या वतीने ॲड. किरण जऱ्हाड यांनी कामकाज पाहिले.

## गटकळ कॉलेजचा निकाल शंभर टक्के

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** लेट श्री एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा शैक्षणिक वर्ष २०२५ – २६चा इयत्ता बारावीचा निकाल शंभर टक्के लागला असून निकालाची परंपरा कॉलेजने कायम ठेवली आहे. विद्यालयातून विज्ञान शाखेमधून प्रथम तीन आलेल्या विद्यार्थी अनुक्रमे

पाटील ऋत्विक शरद.८१.६७%, नायक निकिता नितीन.८०.५०% , पवार तनश्री अशोक ७४.३३ असे आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष ॲड भाऊसाहेब टेमक व सुरेखा टेमक यांनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यालयाच्या प्राचार्या, सुपरवायझर व सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## अतिक्रमणे नियमित करा, पट्टे वाटपाला गती द्या

### सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करा : जिल्हाधिकारी विनय गौडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :**शासकीय जमिनीवरील २०११ पूर्वीची अतिक्रमणे नियमित करणे, पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप करणे तसेच महसूल व ग्रामविकास विभागातील प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.एस. यांनी दिले. गंगापूर येथील मध्यवर्ती शासकीय भवनात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कडक सूचना केल्या.

बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम., उपविभागीय अधिकारी एकनाथ बंगाळे, उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश पालवे, तहसीलदार नवनाथ वगवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी जनगणना कामे, आपले सरकार व पीजी पोर्टलवरील तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश दिले. एक महिन्यांपेक्षा जास्त काळ प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद निपटारा करणे, महसूल मंत्री कार्यालयाकडून आलेल्या संदर्भांची तत्काळ पूर्तता करणे, तसेच नागरिकांच्या तक्रारींसाठी तालुका व उपविभाग स्तरावर विशेष कक्ष उभारण्यास सांगितले.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना, जलयुक्त शिवार, जल जीवन मिशन, महाआवास योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, लखपती दीदी अभियान, आयुष्यमान कार्ड, सिकलसेल ॲनिमिया तपासणी आदी योजनांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील पाणीटंचाई निवारण, अंगणवाडी बांधकामे, शाळांतील शौचालय सुविधा, स्मशानभूमी विकास व सार्वजनिक सुविधांवर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तसेच आठवड्यातून दोन दिवस तहसीलदारांनी व आठवड्यातून एक दिवस उपविभागीय अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जनसंवाद साधून नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात, असे निर्देशही जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले. बैठकीस विविध खात्यांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इस्रायलमध्ये 'होम बेस्ड केअरगिव्हर' क्षेत्रात रोजगार संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) यांच्या माध्यमातून इस्रायलमध्ये 'होम बेस्ड केअरगिव्हर' या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. केंद्र सरकारच्या सहकार्याने Govenment-to-Govenment (G2G) पद्धतीने ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, पात्र व प्रशिक्षित भारतीय उमेदवारांना यामध्ये संधी मिळणार आहे. या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय २५ ते ४५ वर्षे दरम्यान असणे आवश्यक आहे. उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असावा तसेच इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान आवश्यक आहे. याशिवाय उरॲशसर्ळीशॲ किंवा र्छीऔळपस संबंधित प्रशिक्षण (G¦A, ANM², GNM², B.Sc NuA°sing) असणे अनिवार्य आहे. उमेदवाराने यापूर्वी इस्रायलमध्ये काम केलेले नसावे. तसेच उमेदवाराचा/तिचा जोडीदार, पालक किंवा मुले सध्या इस्रायलमध्ये कार्यरत नसावेत किंवा तेथील रहिवासी नसावेत. उमेदवाराकडे किमान तीन वर्षे वैध पासपोर्ट असणे आवश्यक आहे. सदर भरती प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती https://mahaashtaintenational.com या संकेतस्थळावरील 'Latest गेली' विभागात उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. जिल्ह्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन या रोजगार संधीची माहिती अधिकाधिक उमेदवारांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१, रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा, असे सहाय्यक आयुक्त सु.रा. वराडे यांनी कळविले आहे.

## ग्रुप ग्रामपंचायतीच्या चौदावा वित्त आयोगातील कामांची चौकशी करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तांदुळवाडी, उत्तरवाडी, बोलठाण येथील चौदावा वित्त आयोग निधीतून करण्यात आलेल्या विकासकामांची चौकशी करावी, अशी मागणी सरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, चौदावा वित्त आयोगाच्या निधीतून गावात विविध विकासकामे करण्यात आली. मात्र या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संबंधित कामांची सविस्तर माहिती, बँक स्टेटमेंट, मोजमाप पुस्तिका (एमबी) तपासण्यात यावी तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सत्यता पडताळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, निधीचा योग्य वापर झाला का, कामे दर्जेदार झाली का आणि मंजूर कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली का, याची चौकशी होणे आवश्यक आहे. यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांमध्ये पारदर्शकता येईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर सरपंच अनिल राजगिरे यांच्यासह रवींद्र राऊत, मदन राजगिरे, कृष्णा जगदाळे, पांढरीनाथ जगदाळे, नवीन राजगिरे, उत्तम राऊत, मनोज नारळे व अजय नारळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सदर प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# राहाता तालुक्यात जनता लोड शेडिंगने त्रस्त

## अधिकारी मात्र आपल्याच नादात मस्त

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** सध्या उन्हाळ्याचे दिवस असून प्रचंड उन्हाच्या कडाक्याने जनता होरपळून निघत आहे असे असताना महावितरण कडून केली जाणारी लोड शेडिंग , कायम वीजपूरवठा खंडीत होत असल्याने संपूर्ण तालुका त्रस्त असून अधिकारी मात्र आपल्याच मूडमध्ये मस्त असल्याचे चित्र शिर्डी मतदारसंघात पहावयास मिळत आहे .

राहाता तालुका म्हणजेच ना. राधाकृष्ण विखे यांचा शिर्डी मतदारसंघ एक आदर्श मतदारसंघ अशी तालुक्याची ओळख आहे येथील नागरिकांना कुठल्याही प्रकारे त्रास होऊ नये म्हणून ना. विखे व डॉ. सुजय विखे हे जातीने लक्ष घालून प्रत्येक नागरिकांच्या समस्या सोडवण्यात अग्रेसर असतात परंतु याला अपवाद महावितरणचे अधिकारी ठरत असून ना. राधाकृष्ण विखे यांच्या मतदारसंघालाच येथे कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांमुळे गालबोट लागत असल्याची चर्चा सध्या मतदारसंघात आहे.

### महाराष्ट्रात मुबलक विज ; राहात्यात लोडशेडींग

महाराष्ट्र सरकार राज्यात कुठल्याही प्रकारची विजटंचाई नसल्याचा दावा करत असताना राहाता तालुक्यात विजेचा तुटवडा असल्याचे अधिकारी सांगत आहे . बाजूच्या तालुक्यात लोडशेडींग होताना दिसत नाही मात्र राहाता तालुक्यात लोडशेडींग कसे ,शिर्डी शहराचा मोठा वापर सोडल्यास कुठेही मोठा इंडस्ट्रीयल एरिया नाही, उन्हाळा असल्याने शेती पंपाचा लोड नाही, तरी राहाता तालुक्याच्या वाट्याला लोडशेडींग कसे हे न उमजणारे कोडे आहे.

गेल्या चार वर्षापासून राहाता विभागाचे उप अभियंता डी डी पाटील यांच्या हातात कारभार आहे. आता उपविभागाच्या अंतर्गत अनेक उपशाखा असून त्या ठिकाणीं कनिष्ठ अभियंता व त्यांचा कर्मचारी वर्ग कार्यरत



असतो . ज्या गावांना वायरमन ची नेमणूक असते तो कधीच त्या गावात सापडत नाही. ग्राहकांनी मोबाईल वर तक्रारी केल्या तर त्याचा झिरो वायरमन त्याचे काम पार पाडत असतो.

शिर्डी मधील नागरीकांनी महावितरणच्या कारभाराला कंटाळून नुकताच यलगार पुकारला आहे. याबाबत शिर्डीकरांची दाद द्यायला हवी. कारण तालुक्यात विजेचे अनेक अडचनी उभ्या असताना त्या तक्रार करूनही सोडवल्या जात नसल्याने नागरीक मुक्याचा मार सहन करत गप्प बसतात. शासनाने विजेचे प्रश्न सोडविण्यासाठी जनता दरबार सारखे मेळावे घेण्यासाठी पुरस्कृत करत असत मात्र याला अपवाद राहाता तालुका ठरत असून ना. विखे यांच्या आदेशाला ते मानत नाही. इतकी मुजोरी सदर अधिकारी करत असून अशा कामचुकार अधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखवणे गरजेचे आहे.

## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि .७ मे २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-४ | १५८<br>२४८<br>२२० | जोड<br>५९-७४-१६-८०-४३ |

### कल्याण

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>२२८ | २-९ | १२६<br>४३०<br>११७ | जोड<br>२१-८९-०३-२५-९६ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| २७०<br>२८९<br>२२५ | ९-५ | १४०<br>२३०<br>७८० | जोड<br>९०-४५-१३<br>२६-६७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 / 35 / 258 | 125 / 86 / 169 | 336 / 20 / 136 | 199 / 96 / 338 | 258 / 59 / 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** / ** / *** | 120 / 30 / 118 | 679 / 23 / 346 | 134 / 83 / 247 | 249 / 52 / 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 125 / 28 / 170 | 249 / 55 / 780 | 570 / 20 / 677 | 377 / 73 / 247 | 134 / 87 / 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 / 82 / 778 | 126 / 93 / 157 | 679 / 22 / 578 | 139 / 34 / 400 | 689 / 30 / 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 / 46 / 358 | 156 / 29 / 568 | 779 / 38 / 233 | 126 / 92 / 246 | 123 / 65 / 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 / 76 / 457 | 229 / 39 / 469 | 266 / 48 / 170 | 168 / 53 / 580 | 145 / 09 / 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 / 47 / 269 | 244 / 03 / 247 | *** / ** / *** | 257 / 48 / 279 | 466 / 65 / 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 / 16 / 240 | 168 / 56 / 880 | 578 / 05 / 889 | 248 / 43 / 148 | 334 / 09 / 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 / 56 / 899 | 200 / 21 / 380 | 460 / 02 / 499 | 127 / 02 / 138 | 670 / 38 / 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 / 34 / 356 | 455 / 46 / 178 | 569 / 03 / 788 | 130 / 46 / 240 | 330 / 64 / 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 / 90 / 136 | 134 / 87 / 160 | 270 / 97 / 278 | 119 / 12 / 156 | 169 / 66 / 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 / 70 / 226 | 145 / 02 / 778 | 135 / 98 / 477 | 350 / 82 / 156 | 124 / 78 / 468 |
| 13/04/2026 to [redacted] | 56[redacted] / 06 / 15[redacted] | 14[redacted] / 43 / 67[redacted] | 23[redacted] / 45 / 50[redacted] | 133 / 77 / 89[redacted] | 26[redacted] / 85 / 14[redacted] |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 / 63 / 120 | 440 / 85 / 780 | 160 / 71 / 128 | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

## जमिनीच्या वादातून लोखंडी गजाने मारहाण

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील गुंडेगाव शिवारात घराच्या जागेच्या कारणावरून दोन गटात जोरदार वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन एकाच कुटूंबातील पती-पत्नीला लोखंडी गजाने बेदम मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जया भरत जगताप यांनी दिलेल्या फिर्यादि आणि आरोपी रेणुका पांडुरंग भोसले, संगिता तुषार भोसले, अमोल भोसले, योगेश भोसले, व विनोद (पूर्ण नाव माहित नाही) यांच्यात गुंडेगाव शिवारातील पाऊतका वस्ती येथील जागेवरून वाद सुरू होता. ४ मे रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास याच कारणावरून आरोपींनी फिर्यादीच्या घरी जाऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यात सुरूवात केली. वाद वाढल्यानंतर आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण करत दमदाटी केली. यावेळी आरोपी तुषार भोसले याने हातातील लोखंडी गजाने फिर्यादी व त्यांच्या पतीवर हल्ला केला. या हल्ल्यात पती-पत्नी दोघेही जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी सहा जणांच्या विरूध्द गुन्हा नोंदवण्यात आला असून सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार लाड पुढील तपास करत आहेत.

## तरूणाला लोखंडी रॉडने बेदम मारहाण

**अहिल्यानगर :** भिंगार येथील गोविंदपुरा नाका परिसरात एका तरूणाला मारहाण करण्यात आली. याबाबत अभिलेख धर्मेंद्र वाघेला (वय- ३४, रा. नेहरू कॉलनी, भिंगार) यांनी फिर्यादी दिली की, आरोपी मंगलसिंग उर्फ महावीर संतोषसिंग धारीवाल यांना सहा वर्षापूर्वी दोन लाख रूपये दिले होते. हे पैसे वाघेला यांनी परत मागितले असता आरोपीला त्याचा राग आला. ४ मे रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास गोविंदपुरा नाका येथे आरोपींनी फिर्यादीला गाठले यावेळी सुदर्शन मोहन गोहेर, मंगलगि धारीवाल व विशाल गोपाल गोहेर यांनी मिळून वाघेला यांना अर्वाच्या भाषेत शिवीगाळ करण्यात सुरूवात केली. याच वादाचे रूपांतर मारहाणीत झाले.

## आयशर टेम्पोच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू; चालकाविरुद्ध गुन्हा

**लिंपणगाव** : तालुक्यातील विसापूर गावच्या शिवारात चाभूरडी चौकात भडगाव वेगात जाणाऱ्या आयशर टेम्पोने पुढे चाललेल्या सायकलला धडक दिली . या भीषण अपघातात सायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दि. ०२ मे रोजी सायंकाळी सुमारे ०७.१० वाजण्याच्या सुमारास विसापूर ते रांजणगाव मशिद रोडवर आयशर टेम्पो (क्र. एमएच ०४ एलई २३४३) चालक अक्षय रामचंद्र धावडे (रा. गुंडेगाव) याने निष्काळजीपणे व वेगाने वाहन चालवत सायकलला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात जयसिंग बापू सोनवणे (वय ६५, रा. विसापूर) यांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने जखमींना कोणतीही मदत न करता तसेच अपघाताची माहिती न देता घटनास्थळावरून पळ काढल्याचे फिर्यादी रामदास माणिक सोनवणे (वय ४५, रा. कोळगाव लगडवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ११९/२०२६ अन्वये बीएनएस कलम १०६(१), २८१, १२५ (अ)(ब) तसेच मोटार वाहन कायदा १३४ (अ) (ब), १७७/१८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातातील जखमीला श्रीगोंदा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताच्या गुन्ह्याच्या अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गाजरे पुढील तपास करीत आहेत.

## माही जळगाव परिसरातील ग्रामपंचायतींचा कारभार रामभरोसे

**माही जळगाव** : माहिजळगाव परिसरातील सर्व ग्रामपंचायतचा कारभार रामभरोसे चालू आहे. त्यामुळे विकास कामांना खीळ बसली असून शासनाने माही जळगाव परिसरातील ग्रामपंचायतच्या निवडणुका घ्याव्यात व नवे कारभारी निवडावेत. अशी मागणी परिसरातील नागरिकांच्या चर्चेतून पुढे येत आहे.

माहिजळगाव परिसरातील बऱ्याच काही ग्रामपंचायतीवर प्रशासक आहेत. प्रशासकाला ग्रामपंचायत मध्ये नवीन विकासाचे काम करण्याचा अधिकार नाही. कोणताच प्रशासक ग्रामपंचायतचा विकासकाम करू शकत नाही व गोरगरीब जनतेला न्याय देऊ शकत नाहीत. प्रशासकाला नियमितपणे ग्रामपंचायत मध्ये येत नसल्यामुळे सर्व प्रशासक ग्रामसेवकांना पंचायत समितीमध्ये बसून कारभार चालू आहे . ग्रामपंचायतच्या विकास कामांना खीळ बसले आहे. आज काही ग्रामपंचायतीमध्ये दोन वर्षे झाले प्रशासक राज्य आहे. माहीजळगाव परिसरातील ५० टक्के पेक्षा ग्रामपंचायत वर प्रशासक आहेत . माही जळगाव परिसरातील ग्रामपंचायत वर कुठलाच विकास निधी मिळत नसल्यामुळे सर्व ग्रामपंचायतचा कारभार सरपंच विना ठप्प आहे. माही जळगाव गाव परिसरातील सर्व नागरिकांची शासनाला विनंती आहे की, आपण लवकरात लवकर ग्रामपंचायतचे कारभारी निवडावेत व ग्रामपंचायतचे निवडणूक कार्यक्रम घेण्यात यावा. अशी नागरिकांच्या वतीने सरकारकडे मागणी करण्यात आली आहे.

# श्रीगोंदा प्रत्यक्ष बांधावर - शिवरस्ता अंमलबजावणीचे आणखी एक मोठे यश!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : थिटे सांगवी - घोगरगाव लगत मांदळी शिवरस्ता प्रकरणात प्रशासन व चळवळीच्या संयुक्त प्रयत्नातून यशस्वी सीमांकन करून आता रस्ते खुले करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. दिनांक ४ एप्रिल रोजी श्रीगोंदा/पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्या नेतृत्वाखाली,

तहसीलदार सचिन डोंगरे व भूमी अधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशाने, चळवळीचे मार्गदर्शक दादासाहेब जंगले पाटील यांच्या उपस्थितीत थिटे सांगवी - घोगरगाव लगत मांदळी शिवरस्त्याची मोजणी व सीमांकन प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली.

यावेळी मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी अचूक सीमांकन केले, तरमहसूल मंडळ अधिकारी बाळासाहेब सुद्रिक,तलाठी अश्विनी श्राद्धे मॅडम,पोलीस प्रशासनाकडून पीएसआय भैलुमे व कॉन्स्टेबल व्यवहारे मॅडम यांच्या सहकार्याने रस्ता खुला करण्याची पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली. रस्त्याची लांबी: अंदाजे १.५ ते २ किमी लाभार्थी: जवळपास २५० शेतकरी या वेळी विठ्ठल जरांगे, सागर शेळके व परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी म्हटले आहे की, या ऐतिहासिक कामासाठी सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ यांचे चळवळीच्या वतीने दादासाहेब जंगले पाटील व अँड गोरख कडूस यांच्याकडून आभार व्यक्त करण्यात येत आहे.

आपला संघर्ष फळाला येत आहे.राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला हक्काचा शेतरस्ता मिळावा यासाठी शिव पानंद शेत रस्ता चळवळ राज्यभर जनजागृती व सातत्याने पाठपुरावा करत आहे. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकार्य करावे असे आवाहन शेतपानंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी केले आहे.

# ओंकार साखर समूहावर अफवांचा हल्ला

## अब्रू नुकसानीचे दावे ठोकणार: बोत्रे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** राज्यातील मोठ्या साखर उद्योगांपैकी एक असलेल्या ओंकार साखर उद्योग समूहावर सोशल मीडियातून अफवांचा सुनियोजित मारा होत असल्याचा गंभीर आरोप कंपनीने केला आहे., संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. खोटी माहिती पसरवून उद्योगाची प्रतिमा मलिन करण्याचा कट रचला जात आहे, असा ठाम दावा ओमराज बोत्रे यांनी प्रसिद्धी पत्रकात केला आहे.

ओंकार साखर उद्योग समूहाकडून प्रसिद्धी पत्रकात दिलेल्या माहितीनुसार, राज्यासह कर्नाटक, तेलंगणा व उत्तर प्रदेशात एकूण १७ साखर कारखाने सुरू असून चालू हंगामात तब्बल ७५ लाख टन ऊस गाळप करण्यात आले आहे. यंदा १ कोटी टन गाळपाचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. या उद्योगाशी थेट ८ लाख शेतकरी, १८ हजार कामगार व मोठ्या प्रमाणावर वाहतूकदार जोडलेले आहेत.दरम्यान, देयकांबाबतही ओंकार उद्योग समूहाने आपली भूमिका मांडत आतापर्यंत १८३० कोटी रुपये ऊस बिल आणि ७१० कोटी रुपये वाहतूकदारांना अदा केल्याचे सांगितले आहे. उर्वरित देयके लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.ओंकार उद्योग समूहाने आरोप केला आहे की, काही समाजविघातक घटक जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून शेतकरी व कामगारांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत. या प्रकरणी विविध ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले असून, संबंधितांविरोधात लवकरच अब्रुनुकसानीचे दावे दाखल केले जाणार आहेत.केंद्र सरकारच्या इथेनॉल धोरणामुळे सुमारे ६०० कोटी रुपयांची रक्कम अडकली असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले आहे.

# प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांना राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**निघोज** : मुलिका देवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सहदेव आहेर यांना बी द चेंज फौंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार देण्याचे जाहीर केले आहे. शिर्डी येथे दि.७ जून रोजी या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती बी द चेंज फौंडेशनचे पदाधिकारी अभिषेक तुपे यांनी दिली आहे. ही संस्था राज्यातील सामाजिक कार्यात अग्रभागी असून शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देण्याचे काम ही संस्था करीत आहे.

गेली दहा वर्षांपूर्वी निघोज आणी परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने हे महाविद्यालय निघोज येथे सुरू केले. पहिल्या दिवसापासून ते आजपर्यंत प्राचार्य म्हणून डॉ.आहेर सर यांच्यावर या महाविद्यालयाची जबाबदारी आहे. परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी प्राचार्य डॉ आहेर यांनी या महाविद्यालयात शैक्षणिक सुविधा निर्माण करुण परिसरातील महाविद्यालयातील शेत जमीनीत मोठा बागबगीचा तयार केला आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी शांत वातावरण असणारा हा बगीचा भविष्यात पर्यटन केंद्र होईल अशाप्रकारे या ठिकाणी सुविधा निर्माण केल्या आहेत. विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करता येण्यासाठी त्यांना मार्गदर्शन होण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

# वीस वर्षांनी माजी विद्यार्थी एकत्र ; आनंद विद्यालयात स्नेह मेळावा संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिराळ चिचोंडी :** श्री आनंद विद्यालय चिचोंडी येथे सन २००५, २००६ च्या दहावी बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा जुन्या आठवणींना उजाळा देत स्नेह मेळावा कार्यक्रम पार पडला.

तब्बल वीस वर्षांनी एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील मस्ती एकत्रित केलेल्या अभ्यास, शिक्षका चा विद्यार्थ्यावरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा दिलेली शिक्षा स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयावर गप्पा करून आठवणींना उजाळा दिला.


अध्यक्षस्थानी प्राचार्य फकीर सर होते. वीस वर्षांनी भेटलेले मित्र मैत्रिणी आपले रोजचे सुख दुःख विसरून पुन्हा एकदा शालेय आठवणी मध्ये रमले. वर्षातून एकदा तरी भेटायचं आणि शालेय जीवनातील तो आनंद परत मिळवण्याचा निर्णय त्यांनी घेतला. जेथे अभ्यासाचे धडे गिरवले त्या शाळेच्या ऋणातून उतराई होण्यासाठी शाळेला आवश्यक सुविधा देण्यावर चर्चा झाली. परतीच्या प्रवासाला निघताना सर्वांच्या डोळ्यात पाणी होते. प्राचार्य फकीर सर, उपप्राचार्य शिंदे सर, वानखेडे सर, वडघुले मॅडम आदी यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी वैभव आव्हाड ,रवींद्र काळे ,मच्छिंद्र भिंगार दिवे, राहुल पाथरकर गणेश आवटी ,चंद्रकांत आव्हाड ,संतोष गीते ,निलेश कचरे ,भाग्येश गरुड, अशोक वंजारे, आदिनाथ पालवे ,रामदास तागड, आरती गुगळे, अफिन शेख ,राजू गिते यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

सूत्रसंचालन राहुल पाथरकर यांनी केले तर वैभव आव्हाड यांनी आभार मानले.

# ओंकार शुगर समूह विरोधात सोशल मीडियावर बदनामी केल्याचा आरोप रविराज साबळे वर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**श्रीगोंदा** : ओंकार शुगर उद्योग समूहाविरोधात सोशल मीडियावर खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करून बदनामी केल्याचा आरोप करत प्रतिनिधी सचिन गंगाराम चौधरी यांनी श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चौधरी हे ओंकार शुगर साखर कारखाना युनिट क्रमांक ०७, देवदैठण (ता. श्रीगोंदा) येथील प्रतिनिधी आहे . दि. ०२ मे २०२६ रोजी शेतकरी भाऊसाहेब शोभाचंद शेळके व देवराम बाजीराव चौधरी यांनी दिलेल्या अर्जाच्या आधारे ही तक्रार करण्यात आली आहे.तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, रविराज साबळे पाटील (रा. भूम, जि. धाराशिव) यानी त्यांच्या 'ीर्ींळीरक्षीरलरश्रश- रिंळश्र' या सोशल मीडिया अकाउंटवर दि. २९ एप्रिल २०२६ रोजी एक व्हिडिओ प्रसारित केला. या व्हिडिओमध्ये ओंकार उद्योग समूह तसेच चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील याच्याविरोधात खोटी, अप्रमाणित व मानहानीकारक विधाने केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ओंकार समूह हा राज्यात व राज्याबाहेर साखर कारखाने यशस्वीरीत्या चालवणारा अग्रगण्य उद्योग समूह असून शेतकरी, कामगार व वाहतूकदारांना वेळेवर मोबदला देण्याबाबत ओळखला जातो, असे तक्रारीत नमूद आहे. मात्र, संबंधित व्हिडिओमध्ये शेतकऱ्यांचे थकीत देयक, कामगारांचे प्रश्न तसेच इतर आर्थिक बाबींविषयी चुकीची माहिती देण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

तसेच, या व्हिडिओमुळे शेतकरी, कामगार व उसतोड कामगारांमध्ये अविश्वास निर्माण होण्याची शक्यता असून कारखान्यांवर बेकायदेशीर जमाव जमवून नुकसान घडवून आणण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय, संबंधित व्हिडिओमध्ये बाबुराव बोत्रे पाटील यांनी एका सहकारी बँकेची फसवणूक केल्याचा, हवाला मार्गे आर्थिक व्यवहार केल्याचा तसेच साखर विक्रेत्यांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप करण्यात आल्याचे ही तक्रारीत नमूद आहे. हे सर्व आरोप पूर्णपणे खोटे, बिनबुडाचे व दिशाभूल करणारे असल्याचे तक्रारदारांनी स्पष्ट केले आहे.

तक्रारदारांच्या मते, अशा प्रकारच्या अप्रमाणित व चिथावणीखोर माहितीमुळे जनमानसात गैरसमज पसरवण्याचा व उद्योग समूहाची प्रतिमा मलिन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बेलवंडी पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

# अन्यथा एसटी बस रोको आंदोलन - सरपंच शरद पवार

## चिचोंडी पाटील एसटी बस स्टॅन्ड त्वरित बांधावे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : चिचोंडी पाटील येथील बस स्टॅन्ड चे काम अनेक दिवसापासून रस्त्याच्या कामामुळे प्रलंबित आहे. त्यामुळे प्रवासी विद्यार्थी,ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी यांना तासन तास उन्हात ताटकळत उभा राहावे लागत आहे,तरी महामंडळाने हे बस स्टॉप चे काम त्वरित पूर्ण करावे.तसेच चिचोंडी पाटील येथे नगरकडे व जामखेड कडे जाणाऱ्या सर्व बस थांबल्याच पाहिजे.अन्यथा बस रोको आंदोलन करणार असल्याचा इशारा सरपंच शरद पवार व ग्रामस्थांनी दिला आहे.

चिचोंडी पाटील गावचे सरपंच शरद पवार यांनी चिचोंडी पाटील येथील एसटी बस स्टॅन्ड संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. गेल्या अनेक दिवसापासून नगर जामखेड मार्गाचे काम सुरू आहे. त्यामुळे चिचोंडी पाटील येथील एसटी बस थांबा हा पाडण्यात आला आहे. त्यामुळे चिचोंडी पाटील येथील व थांब्यावरून नगर कडे अथवा जामखेड कडे जाणाऱ्या प्रवाशांना रस्त्यात ताटकळत थांबवावे लागत आहे. शाळकरी विद्यार्थ्यांचे यामुळे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. तरी एसटी प्रशासनाने चिचोंडी पाटील बस स्टॅन्ड चे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अन्यथा सर्व ग्रामस्थांसह चिचोंडी पाटील येथे बस रोको आंदोलन करण्यात येईल. असा इशारा पवार यांनी दिला आहे.

## शेवगावमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत

# लाभार्थ्यांना चावी व प्रमाणपत्रांचे वितरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अमरापूर** : शेवगाव नगर परिषदेमार्फत पंचायत समिती कार्यालय, येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थ्यांना चावी व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मुख्याधिकारी श्रीमती विजया घाडगे व नगराध्यक्षा श्रीमती मायाताई अरुण मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी प्रधानमंत्री आवास योजना १.० अंतर्गत बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना घरांच्या चाव्या व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच योजना २.० अंतर्गत नव्याने मंजूर लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्र देण्यात आले असून, पूर्वी मंजूर लाभार्थ्यांना बांधकाम परवानगी आदेशही प्रदान करण्यात आले.

शेवगाव नगर परिषद हद्दीत प्रधानमंत्री आवास योजना १.० अंतर्गत एकूण २९८ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी २८२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे, तर उर्वरित १६ घरकुले प्रगतीपथावर आहेत. या योजनेसाठी सुमारे ७ कोटी १ लाख ७० हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत १९८ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली असून ४१ प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत. आणखी १६ प्रस्ताव लवकरच सादर करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान नगराध्यक्ष अरुणभाऊ मुंडे यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्या तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले. भाडेतत्त्वावर राहणाऱ्या नागरिकांना लवकरच स्वतःचे पक्के घर उपलब्ध करून देण्यासाठी जागा मंजुरीचा प्रस्ताव नगर परिषदेमार्फत सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांचे प्रश्न तत्काळ मार्गी लावण्यासाठी नगर परिषद सक्षम असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शासनाच्या नव्या धोरणानुसार, ज्या नागरिकांकडे पक्के उतारे नसून नगरपरिषद उतारे आहेत, अशा नागरिकांना मागील तीन वर्षांच्या करपट्टीच्या आधारे घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

या कार्यक्रमास शिवसेना नेते श्री अरुणभाऊ मुंडे, उपनगराध्यक्ष ताहेरभाई पटेल, नगरसेवक संजयभाऊ फडके, सुनीलजी काकडे, नंदकुमारजी मुंडे, कैलासभाऊ तिजोरे, वजीरभाई पठाण, संतोषभैया जाधव, बाबासाहेबजी लांडे, निलेशभाऊ रोकडे, जाकीरभाई कुरेशी, प्रवीणभाऊ भारस्कर, नितीनशेठ दहिवाळकर, विनोदभाऊ मोहिते, अमरभाई शेख, ज्ञानेश्वरजी लिंगे, गणेशभाऊ कोरडे यांच्यासह नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक सुनील पगारे, सीएलटीसी अभियंता शाहरुख आतार, लिपिक राजेंद्र काते व हबीब शेख उपस्थित होते.

## जि.प. आरोग्य अधिकारी पदी डॉ. यश भापकर

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील गुंडेगाव येथील डॉ. यश भापकर यांची जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या आरोग्य अधिकारी म्हणूनप नगर तालुक्यातील रूईछत्तीसी येथे रिक्त पदावर निवड झाली आहे.

डॉ. यश भापकर यांनी प्राथमिक शिक्षण भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल शाळेत पूर्ण केले. पुढे कोल्हापुर येथे डी.वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय पदवी शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. दिवसरात्र केलेल्या अभ्यासामुळे व योग्य मार्गदर्शनामुळे वैद्यकीय अधिकारी या पदावर त्यांनी यश मिळविले. त्यांच्या या यशामध्ये गुंडेगाव येथील भापकर हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. नयना भापकर व डॉ. गजानन भापकर तसेच शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

द•ख•ल

# आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा करावी, मागणी

**शिरूर:-** नसरापूर येथे घडलेल्या अमानुष लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ शिरूरल संतापाची लाट उसळली असून,आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा करावी,अशी मागणी शिरूरकरांच्यावतीने करण्यात आली.या पार्श्वभूमीवर विविध संस्था संघटना,सामाजिक, राजकीय आणि नागरिक संघटनांच्या प्रतिनिधींनी शिरूर पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस निरीक्षक संदेश केंजळे व नायब तहसीलदार



प्रकाश मुसळे यांना निवेदन सादर केले.यावेळी शिरूरच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,नगरसेवक रवी उर्फ शाम मनोहर ढोबळे, नगरसेविका आयेशा सय्यद,संगीता मल्लाव,शोभना पाचंगे,शशिकला काळे,प्रिया बिरादार,सविता बोरुडे,उषा वाखारे,बापु सानप,डॉ.संतोष पोटे,प्रितेश फुलडाळे,योगेश जामदा यांसह अनेक महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालयात करून आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी यावेळी निवेदन देऊन करण्यात आली.

## जयदादा पवारांचा विजयानंतरही न थांबता जनसंवाद

**बारामती -** विधानसभा पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या विक्रमी विजयाच्या पार्श्वभूमीवर जयदादांनी तात्काळ जनसंवादाला प्राधान्य दिले. (दि:५ ) रोजी सकाळी १०:३० वाजता सुरू झालेली बैठक सायंकाळी ५ वाजेपर्यंत अखंड सुरू राहिली. सुमारे ६ तास ३० मिनिटांच्या या मॅरेथॉन संवादात दोन जिल्हा परिषद गट आणि माळेगाव नगरपंचायतीतील कार्यकर्त्यांशी थेट चर्चा करण्यात आली. या बैठकीत कार्यकर्त्यांच्या भावना, अपेक्षा आणि सूचनांना मनापासून ऐकून घेण्यात आले. प्रत्येक कार्यकर्त्याशी संवाद साधत त्यांच्या सहभागाला महत्त्व देणे, हीच प्रभावी नेतृत्वाची खूण असल्याचे यातून दिसून आले. जय पवारांचा या उपक्रमातून विजय साजरा करण्यापेक्षा जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तात्काळ कामाला लागणे, हीच खरी नेतृत्वाची जबाबदारी असल्याचा संदेश देण्यात आला.



## आज जय पवार यांचा ‘जनता दरबार’

**बारामती :** बारामतीच्या विकासासाठी आयुष्यभर झटणारे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यपद्धतीचा वारसा पुढे नेत युवा नेते जय पवार यांनी ‘जनता दरबार’ हा उपक्रम सुरू केला आहे. नागरिकांच्या समस्या थेट ऐकून त्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते जय अजितदादा पवार यांच्या पुढाकारातून आज गुरुवार (दि:७ ) रोजी बारामती येथे ‘जनता दरबार’ आयोजित करण्यात येणार आहे. सहयोग निवासस्थानी होणाऱ्या या उपक्रमातून नागरिकांना आपल्या विविध समस्या, अडचणी आणि मागण्या थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. हा जनता दरबार सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत पार पडणार असून, बारामती शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अजितदादा पवार यांनी आपल्या कार्यकाळात नागरिकांशी थेट संवाद साधण्यावर नेहमीच भर दिला होता. त्याच धर्तीवर जय पवार यांनी हा ‘जनता दरबार’ सुरू करत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे युवा नेते जय पवार हे नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेण्यावर भर देत आहेत. ‘जनता दरबार’ या संकल्पनेमुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होऊन समस्यांचे जलद निराकरण होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. या उपक्रमामुळे विशेषतः सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडवण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बारामतीकरांमध्ये या कार्यक्रमाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# भोरला संग्राम थोपटेंनी केले ११ कोटी ९८ लाखांच्या विकास कामांचे लोकार्पण

### भाजपा जिल्हाध्यक्ष शेखर वढणे उपस्थित : व्यापारी संकुल आणि जलतरण तलावाचा समावेश

**विक्रम शिंदे । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** भोर शहरातील एस.टी.बस स्टॅन्ड समोरील उभारण्यात आलेले भव्य श्री.छत्रपती संभाजीराजे व्यापारी संकुल (८ कोटी ८३ लाख )आणि रामबाग येथे बांधण्यात आलेला राजमाता जिजाऊ जलतरण तलाव बांधणे (३ कोटी १५ लाख) अश्या एकूण ११ कोटी ९८ लाखांच्या निधीतून भोर नगरपरिषदेच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांचे उदघाट्न आज( दि.२१) माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष शेखर वढणे आदी मान्यवर उपस्थित होते.

भोर शहराच्या निसर्गरम्य सौंदर्यात व वैभवात भर घालणाऱ्या आणि नगरपरिषदेच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी व्यापारी संकुल महत्वपूर्ण ठरणार आहे.व्यापारी इमारतीचा भव्य लोकार्पण सोहळा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी पुणे जिल्हा परिषद सदस्य स्वरूपा थोपटे, सदस्य पोपटराव सुके, भोर पंचायत समितीचे माजजी उपसभापती मानसिंग धुमाळ, भोर तालूका भाजपा अध्यक्ष संतोष धावले,रविंद्र कंक, राजगड तालूका अध्यक्ष राजू रेणुसे, भोर पंचायत समितीचे सदस्य रोहन बाठे, माऊली पांगारे,सुषमा चव्हाण, गिता आंबवले, कृषी उत्पन्न



बाजार समितीचे सभापती सुरेश राजीवडे, उपसभापती प्रवीण शिंदे, राजगड सहकारी साखर कारखाना संचालक सुभाष कोंढाळकर, सुधीर खोपडे, भोर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा अँड.जयश्री शिंदे, गटनेते अमित सागळे ,जगदीश किरवे ,गणेश पवार , माजी नगराध्यक्ष चंद्रकांत सागळे, सचिन हर्णसकर , संजय जगताप,बंडूशेठ गुजराथी,सचिन मांडके, प्रमोद कुलकर्णी, नारायण जाधव , शहरातील व्यापारी वर्ग, शहर भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रशासनाचे लेखी आश्वासन

### बिरादार यांचे उपोषण स्थगित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शहरात १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले बेमुदत उपोषण अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रिया बिरादार यांनी तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले होते.

तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी तातडीने दखल घेत तहसील, भूमिअभिलेख, नगरपरिषद व ग्रामीण रुग्णालय विभागातील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत प्रस्तावातील त्रुटी त्वरित दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच ८ मे रोजी संबंधित जागेची मोजणी करून



उपजिल्हा रुग्णालयासाठी परिपूर्ण प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवण्यात येईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले.

प्रिया बिरादार यांनी ११ सप्टेंबर २०२५ पासून उपजिल्हा रुग्णालयासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. चुकीचा प्रस्ताव पाठवून नागरिकांची दिशाभूल केल्याचा आरोपही त्यांनी केला होता. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, शासकीय आधार केंद्र सुरू करावे व सीएससी केंद्रांवर शुल्कफलक लावावेत, या मागण्यांसाठी सोमवारी उपोषण सुरू करण्यात आले होते. या आंदोलनाला विविध सामाजिक, महिला व राजकीय संघटनांचा मोठा पाठिंबा मिळाला. प्रशासनाच्या आश्वासनानंतर प्रिया बिरादार यांनी उपोषण स्थगित केले. शिरूर शहरात उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची मागणी आता अधिक जोर धरू लागली आहे.

# ओतूर पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी , गहाळ झालेले ३. ५ लाखांचे १०मोबाईल शोधण्यास यश

### जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या हस्ते मूळ मालकांना केले परत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** ओतूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतून वेगवेगळ्या ठिकाणाहून गहाळ झालेल्या ३ लाख ५० हजार रुपये किमतीच्या १० मोबाईलचा शोध घेण्यात ओतूर पोलिसांना यश आले आहे. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून हे मोबाईल ताब्यात घेण्यात आले. मोबाईल धारकांनी दिलेल्या तक्रारींनंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. गहाळ मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करून पोलिस पथकाने विविध जिल्ह्यांमध्ये शोधमोहीम राबवली. त्यातून एकूण १० मोबाईल हस्तगत करण्यात आले.



जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या हस्ते ७ मोबाईल मूळ मालकांना सुपूर्त करण्यात आले. उर्वरित मोबाईलची प्रक्रिया सुरू आहे.काही महिन्यांपूर्वी हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने मालकांना सुखद धक्का बसला. त्यांनी ओतूर पोलिसांच्या कार्यत्परतेचे व तांत्रिक कौशल्याचे कौतुक केले.

सदरची कामगिरी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांच्या सूचनेनुसार जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील व ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदिप आमणे, पोलीस हवलदार नरेंद्र गोराणे, बाळशिराम भवारी, आशिष जगताप व पोलीस मित्र छोटू मनियार यांच्या पथकाने केली आहे. ओतूर पोलिसांच्या या जलद व प्रभावी कारवाईमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# राजा रघुनाथराव विद्यालयात उन्हाळी क्रीडा शिबिर सुरू



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** भोर एज्युकेशन सोसायटीचे राजा रघूनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भोर येथे फायटर स्पोर्ट्स अकॅडमी पुणे यांच्या सहयोगाने दि.२५ ते ३० दरम्यान उन्हाळी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले.क्रीडा शिबिरात आर्चरी ,रायफल शूटिंग ,लाठी काठी ,योगा,फनी गेम्स ,कराटे ,फुटबॉल ,क्रिकेट आदी आधुनिक तसेच पारंपरिक खेळाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यात येणार आहे.विद्यालयाचे माजी क्रीडा शिक्षक सुनील चोरघे ,इस्माईल शेख यांचे हस्ते क्रीडा शिबिराचे उद्घाटन (दि.२५)करण्यात आले.यावेळी संस्थेचे सचिव डॉ.सुरेश गोरेगावकर यांनी मोबाईलमूळे तरुणाई मैदानी खेळाकडे दुर्लक्ष करत असल्याचे सांगितले.मात्र अभ्यास करण्यासाठी शारीरिक क्षमता विकसित होणे आवश्यक असून खेळामूळे व्यायाम होतो. मन आणि शरीर व्यायामामूळे तंदुरुस्त होते.त्यामुळे खेळासाठी आवश्यक वेळ देण्याची आवश्यकता असल्याचे मत डॉ.गोरेगावकर यांनी व्यक्त केले.यावेळी नियामक मंडळ अध्यक्ष प्रमोद गुजर ,डॉ. आण्णासाहेब बिराजदार ,दतात्रय मोरे ,मुख्याध्यापक लक्ष्मण भांगे ,फायटर स्पोटर्स अकॅडमीचे सौरभ आवाळे ,राष्ट्रीय खेळाडू नगरकर ,पर्यवेक्षक विश्वास निकम ,संतोष दळवी ,विद्यालयातील क्रीडा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा.विक्रम शिंदे यांनी केले.क्रीडा शिक्षक प्रशांत उबाळे ,अनिल जाविर ,सोमनाथ कुंभार ,योगेश केंगले,अमोल मोहिते यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

# आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात वृक्षतोडीला वनविभागाचा पाठींबा ?

### ‘लक्ष्मी दर्शन’च्या चर्चेमुळे संशय; नागरिकांचा गंभीर आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आंबेगाव,:** तालुक्याच्या पूर्व भागात अनधिकृत वृक्षतोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. या प्रकारांकडे वनविभागाकडून अपेक्षित तीव्रतेने कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल सुरू असूनही त्यावर तातडीची कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे वनविभागाकडून या प्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर काही नागरिकांकडून प्रति महिना लक्ष्मी दर्शनसंबंधी चर्चाही पुढे येत असून, या आरोपांमुळे वन अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण झाला आहे. वाढत्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणीय संतुलन धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पावसाचे प्रमाण, जैवविविधता आणि स्थानिक हवामान यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि वृक्षसंवर्धनासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**अनधिकृत वृक्षतोड वाढली; कारवाईअभावी वनविभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**




# तीव्र पाणीटंचाई; घोड कालव्यासाठी तातडीची मागणी, मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आंबेगाव** तसेच जुन्नर तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. विहिरी, बोअरवेल्स कोरड्या पडल्या आहेत, तर शेतकऱ्यांच्या शेतीला पाण्याचा तुटवडा भासत आहे. परिणामी, उभा शेतमाल करपण्याच्या अवस्थेत आला असून अनेक ठिकाणी पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः भाजीपाला, उस, तसेच फळबागांवर याचा मोठा परिणाम दिसून येत आहे. पाण्याअभावी केवळ शेतीच नव्हे, तर जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दैनंदिन वापरासाठीही पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला असून मानसिक तणावही वाढला आहे. अनेक शेतकरी चिंतेत असून शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील घोड शाखा कालव्याला तातडीने पाणी सोडण्यात यावे. या मागणीसाठी राधाकृष्ण विखे यांना मुंबई येथील त्यांच्या निवासस्थानी निवेदन देण्यात आले. या निवेदनात तालुक्यातील सध्याची भीषण परिस्थिती सविस्तर मांडण्यात आली. मंत्री महोदयांनी निवेदन गांभीर्याने स्वीकारून तत्काळ पुणे जिल्हाधिकारी डुडी यांच्याशी संपर्क साधला. यावेळी त्यांनी संबंधित यंत्रणेला आवश्यक ती कार्यवाही करून शक्य तितक्या लवकर घोड शाखा कालव्यात पाणी सोडण्याचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनामुळे शेतकरी वर्गामध्ये काही प्रमाणात दिलासा निर्माण झाला असून लवकरच प्रत्यक्षात पाणी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सोबत पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार केतन वाघ, थोरांदळे गावचे तंटामुक्ती मा अध्यक्ष शंकर टेमगिरे. डॉ. दत्तात्रय विश्वासराव, अनिल पोखरकर हे उपस्थित होते.



# समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जातेगाव ग्रामपंचायतीची पाहणी, गावाच्या प्रगतीचे कौतुक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** पारनेर तालुक्यातील जातेगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत नियुक्त समितीने ग्रामपंचायतीची सखोल पाहणी करत गावातील विविध विकासकामांचा आढावा घेतला. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, कामांची गुणवत्ता आणि नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या मूलभूत सुविधांबाबत समितीने समाधान व्यक्त केले. समितीने गावातील स्वच्छता व्यवस्थापन, पाणीपुरवठा योजना, रस्ते विकास, अंगणवाडी सेवा तसेच शैक्षणिक सुविधांची प्रत्यक्ष स्थळी जाऊन तपासणी केली. विविध योजनांची अंमलबजावणी नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आल्याने गावात सकारात्मक बदल घडून आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. यावेळी गावाच्या



सर्वांगीण प्रगतीचे विशेष कौतुक करण्यात आले. ग्रामपंचायत अधिकारी राजू विधाते यांनी समितीसमोर जातेगावातील विविध विकासकामांची सविस्तर माहिती सादर केली. निधीचा वापर, स्थानिक पातळीवरील नियोजन आणि योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी माहिती दिली. या पाहणीवेळी पंचायत समिती पारनेरचे विस्तार अधिकारी मेहेत्रे साहेब, गट विकास अधिकारी औंढा नागनाथ, जगताप साहेब यांच्यासह समितीचे अधिकारी उपस्थित होते. तसेच प्रशासक संजय दादा गायकवाड, कारभारी पोटघन, पत्रकार विशाल फटांगडे, अंगणवाडी सेविका, शिक्षक हिलाल सर, ग्रामपंचायत कर्मचारी अनिल मारुती ढोरमले, आशा स्वयंसेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वय व सक्रिय सहभागामुळे विकासकामे प्रभावीपणे पूर्ण होत असल्याचे समितीने नमूद केले. जातेगाव हे इतर गावांसाठी प्रेरणादायी व आदर्श ठरू शकते, असे मत समिती सदस्यांनी व्यक्त केले. पाहणी पूर्ण झाल्यानंतर समितीने गावातील विकासकामांचे कौतुक करत पुढील गावाच्या तपासणीसाठी प्रस्थान केले.

# रिव्हॉल्व्हरच्या धाकावर दरोडा ; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

### तासगावच्या व्यापाऱ्याला स्वस्त गव्हाचे आमिष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बनावट फेसबुक अकाउंटवरून स्वस्त दरात गहू देण्याचे आमिष दाखवून व्यापाऱ्याला जाळ्यात ओढत रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून रोख रक्कम व दागिने लुटणाऱ्या टोळीला बारामती तालुका पोलीस ठाणे पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद केले. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून ८ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अटक आरोपींमध्ये रवी संजय माने, श्रीकांत अर्जुन घुले, अभिषेक भाऊसो ठोंबरे आणि अतुल मोहन भोलणकर यांचा समावेश आहे.

तासगाव येथील व्यापारी सूरज सरजेराव गावडे हे गव्हाच्या पिठाच्या व्यवसायात आहेत. फेसबुक मार्केटप्लेसवर स्वस्त गहू विक्रीची जाहिरात पाहून त्यांनी संपर्क साधला. आरोपींनी त्यांना ४ मे रोजी बारामती येथे बोलावले. गावडे हे चालकासह छोटा हत्ती टेम्पोने पैसे घेऊन आले होते.

फोनवरील सूचनेनुसार त्यांना पेन्सिल चौक, त्यानंतर कल्याणी कॉर्नर येथे बोलावण्यात आले. तेथे स्कूटीवर आलेल्या एका संशयिताने शेठने पाठवले आहे असे सांगून त्यांना निर्जन भागात नेले. तेथे आधीच कारमध्ये बसलेले आरोपी तयार होते.

तेथे एका आरोपीने गावडे यांच्या कपाळावर पिस्तूल रोखले, तर दुसऱ्याने चालकाला बंदुकीचा धाक दाखवला. दोघांना मारहाण करून गावडे यांच्या खिशातील २५,५०० रुपये रोख, चांदीच्या अंगठ्या, घड्याळ तसेच चालकाच्या कानातील सोन्याची बाळी हिसकावून घेतली. एकूण ५१,५०० रुपयांचा ऐवज लुटून आरोपी पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वाखाली पथक रवाना झाले. सायबर पोलिसांच्या मदतीने आरोपींच्या हालचालींचा माग काढण्यात आला. उंडवडी, पाटस, शिरसुफळ, कुरकुंभ, भिगवण, कळस आदी भागांतून आरोपी गाडीने पळत होते.

इंदापूर, भिगवण व वालचंदनगर पोलिसांना सतर्क करून नाकाबंदी करण्यात आली.



अखेर सिन्नरमास कंपनीजवळ पोलिसांनी समोरून व मागून घेराव घालत रात्री सुमारे ८.५० वाजता तिघांना कारसह पकडले. चौथा आरोपी अतुल भोलणकर याला घरातून अटक करण्यात आली.

आरोपींकडून ७ लाख ५० हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने, घड्याळ, दोन पिस्तुले, जिवंत काडतूस व ६५ हजार रुपये रोख असा एकूण ८ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# सासरच्या छळाला कंटाळून गोरेगावच्या महिला डॉक्टरची आत्महत्या

## पती, सासू सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर:** लग्नानंतर माहेरहून १२ लाख रुपयांची मागणी, शिवीगाळ, दमदाटी आणि सततच्या मानसिक छळाला कंटाळून २६ वर्षीय महिला डॉक्टरने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथे घडली आहे. डॉ. गौरी सुनिल चौरे (वय २६, रा. काळपट्टी वस्ती, गोरेगाव, ता. पारनेर) असे या दुर्दैवी तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी तिच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पती, सासू आणि सासऱ्यांविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. या घटनेमुळे पारनेर तालुक्यासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, सुनिल जबाजी चौरे (वय ५४, रा. गोरेगाव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरीचे लग्न २३ नोव्हेंबर २०२४ रोजी अमित बाबासाहेब दळवी (रा. तपोवन रोड, अहिल्यानगर; सध्या कामोठा, मुंबई) यांच्याशी मोठ्या थाटामाटात झाले होते. लग्नानंतर सुरुवातीचे तीन महिने अहिल्यानगर येथे सर्व काही सुरळीत होते. त्यानंतर हे जोडपे मुंबईतील कामोठा येथे वास्तव्यास गेले. मुंबईला गेल्यानंतर पती अमित दळवी याने, फ्लॅट घेण्यासाठी माहेरहून १२ लाख रुपये आन अशी मागणी करत गौरीला त्रास देण्यास सुरुवात केली. सासू आणि सासऱ्यांनीही तुम्ही लग्न साधे केले, भाड्याच्या घरात राहण्यापेक्षा पैसे आणा असे म्हणत तिला वारंवार टोमणे मारले.

गौरीने खाजगी रुग्णालयात नोकरी सुरू केली होती, परंतु तिचा पगारही सासरच्यांनी काढून घेतला. तसेच, फेब्रुवारी २०२५ मध्ये तिच्या लग्नातील सोन्याचे दागिनेही बळकावून घेतल्याचे तिने आपल्या आई-वडिलांना फोनवरून सांगितले होते. पती अमित हा दारूच्या आहारी जाऊन पैसे मागण्यासाठी तिला मारहाण करत असे. गौरीने वेळोवेळी आपल्या आई-वडिलांना आणि काकांना याबाबत माहिती दिली होती.

ऑक्टोबर २०२५ मध्ये गौरीच्या चुलत बहिणीचे लग्नात आलेले सासरचे लोक म्हणाले, तुम्ही हे लग्न कसे मोठे केले? आमच्या वेळी भिक लागली होती का? यावर गौरीने आक्षेप घेतला असता, सर्वांसमोर तिचा अपमान करण्यात आला. फेब्रुवारी २०२६ मध्ये गौरीने आपल्या नवऱ्याचे इतर मुलींशी असलेले अनैतिक संबंध असल्याचे घरच्यांना सांगितले. याबाबत तिची आई मुंबईला जाऊन वाद मिटवून आली, तरीही छळ थांबला नाही.


२७ एप्रिल २०२६ रोजी गौरी, तिचा पती अमित आणि सासरे बाबासाहेब हे गोरेगाव येथे आले. त्यावेळी अमितने, तू इथेच थांब, मी पप्पांना नगरला सोडून तुला घ्यायला येतो, असे सांगून तो निघून गेला. त्यानंतर तो परत आला नाही आणि कोणाचेही फोन उचलले गेले नाहीत. २८ एप्रिल २०२६ रोजी गौरी व तिची आई अहिल्यानगर आणि मुंबई येथे गेली, परंतु दोन्ही ठिकाणी घराला कुलूप होते. त्यानंतर ०२ मे २०२६ रोजी गौरी घरात एकटी असताना सकाळी साडेसात ते साडेआठच्या दरम्यान तिने शिलिंगच्या हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. आई शेतातून परत आल्यावर ही घटना उघडकीस आली. उपचारासाठी तिला पारनेर येथील रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

डॉ. गौरी या इक्वड पदवीधर असल्याने त्यांच्या अकाली निधनामुळे गोरेगाव आणि परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांकडून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.

### गुन्हा दाखल, पण आरोपींना अटक नाही

मृत गौरीच्या वडिलांनी पारनेर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, पती अमित बाबासाहेब दळवी, सासू संगीता बाबासाहेब दळवी व सासरे बाबासाहेब हरीभाऊ दळवी यांच्यावर आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, पोलिसांकडून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

## द•ख•ल



### सांस्कृतिक क्षेत्रात प्रशालेची घौडदौड कौतुकास्पद : :दीपक ओहोळ

**अहिल्यानगर** : सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला,माध्यमिक विभागाने शैक्षणिक वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या गिनिजसह पाच विश्वविक्रमी उपक्रमात सहभाग घेतला. महाराष्ट्रदिनी मान्यवरांच्या हस्ते या विविध उपक्रमांच्या माहिती फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, प्राचार्या वसुधा जोशी, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी, प्रयोगशाळा परिचर मिलिंद कुलकर्णी उपस्थित होते. वर्षभरातील या उपक्रमांचे समन्वयक म्हणून दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक डॉ.अमोल बागुल यांनी काम पाहिले. यामध्ये शिक्षण मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित परीक्षा पे चर्चा२०२४-२५ मध्ये प्रशालेचा सहभाग, महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृतच्या वतीने दीपावलीनिमित्त दुर्ग बनवा उपक्रम, भारत सरकारच्या प्रौद्योगिकी व इलेक्ट्रॉनिक मंत्रालयाच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय इंडिया--ख समीटमध्ये -ख प्रश्नमंजुषा व शपथ उपक्रम, शिक्षण मंत्रालय,भारत सरकारच्या वतीने नॅशनल बुक ट्रस्ट - इंडियाच्या वतीने आयोजित शांतता पुणेकर वाचत आहेत-बुक सेल्फी उपक्रम- वरील चारही संकल्पनांचा गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश व महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या वतीने २६ जानेवारी- प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रप्रथम या देशभक्तीपर गीतांवरील नृत्य कवायत उपक्रम - वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस.



### फ्रेंड्स कॉर्पोरेट टी-२० लीग नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्सची विजयी सलामी

**अहिल्यानगर** : फ्रेंड्स कॉर्पोरेट टी-२० लीग स्पर्धेत रविवारी दि ३ मे रोजी पार पडलेल्या सामन्यात नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्स संघाने नगर चॅम्पियन संघावर दिमाखदार विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली. दोन्ही संघांमधील हा सामना रंगतदार ठरला असून प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारा ठरला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना नगर चॅम्पियन संघाने निर्धारित २० षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात १५२ धावा केल्या. सुरुवातीला सावध खेळ करत त्यांनी मधल्या षटकांमध्ये आक्रमक फटकेबाजी केली आणि प्रतिस्पर्ध्यांसमोर आव्हानात्मक लक्ष्य उभे केले. त्यांच्या फलंदाजांनी योग्य वेळी फटकेबाजी करत संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली. १५३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्स संघाने आत्मविश्वासपूर्ण सुरुवात केली. सलामीवीरांनी संघाला भक्कम पाया घालून दिला, तर मधल्या फळीतील फलंदाजांनी धावगती कायम ठेवत विजयाची दिशा निश्चित केली. अखेर १७.१ षटकांत ५ गडी गमावत १५५ धावा पूर्ण करत नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्स संघाने सहज विजय मिळवला. या सामन्यातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल मतीन शेख याला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याच्या सर्वांगीण खेळामुळे संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला गेला आणि निर्णायक क्षणी त्याने संघाला विजयाच्या दिशेने नेले. दरम्यान, स्पर्धेतील सर्व लीग सामने यशस्वीरित्या पूर्ण झाले असून आता उपांत्य फेरीच्या सामन्यांची उत्सुकता वाढली आहे. येत्या काही दिवसांत रंगणाऱ्या उपांत्य सामन्यांमध्ये संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार असून अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी सर्वच संघ सज्ज झाले आहेत. क्रिकेटप्रेमींचे लक्ष आता या निर्णायक सामन्यांकडे लागले आहे.

# भुईकोट किल्ल्याच्या मैदानावर रंगतोय फुटबॉलचा थरार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : फिरोदिया शिवाजियन्स, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (ए.डी.एफ.ए.) आणि फर्नांडिस परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या लेक्स कप या फुटबॉल स्पर्धे च्या ८ व्या पर्वाला नुकतेच प्रारंभ झाले.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे संयुक्त सचिव प्रदीप जाधव यांच्या हस्ते तसेच कार्यकारिणी सदस्य राजेंद्र पाटोळे आणि पल्लवी सैंदाणे यांच्या उपस्थित करण्यात आले. यावेळी फिरोदिया शिवाजियन्सच्या गेल्या ३५ वर्षांपासूनच्या जर्सी रंगांचे प्रतीक असलेल्या लाल आणि पांढऱ्या फुगे आकाशात सोडून उद्घाटन करण्यात आले.

ही स्पर्धा स्वर्गीय लेक्स फर्नांडिस उर्फ बाबा यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येत असून, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या स्थापनेपासून सलग ४५ वर्षे त्यांनी संस्थापक सचिव म्हणून काम पाहिले. अहमदनगर जिल्ह्यात फुटबॉलच्या विकासासाठी त्यांचे योगदान अतुलनीय असून ते कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा घेतली जात आहे.


यंदाच्या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी झाले असून, अंतिम सामना ९ मे २०२६ रोजी खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फिरोदिया शिवाजियन्सच्या कोअर कमिटी सदस्यांमध्ये अभिषेक सोनावणे, पल्लवी सैंदाणे, सचिन पात्रे, जेव्हिअर स्वामी आणि राजेश अँथनी परिश्रम घेत आहेत.

### रंगतदार सलामीचे सामने

सलामीचा सामना फिरोदिया शिवाजीयन्स क्लब विरुध्द सॉकर स्कूल यांच्यात झाला. यामध्ये २-० गोलने फिरोदिया शिवाजीयन्स क्लब विजेता ठरला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही.फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी (अंडर-१५ मुले) विरुध्द युनिटी फुटबॉल क्लब यांच्यात झालेल्या सामना शेवट पर्यंत रंगतदार व अनिर्णित राहिला. शेवटी पेनल्टी शूटआऊटमध्ये ३-२ गोलने फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीने विजय संपादन केले.

# दिल्लीगेटला उभारली जाणार डॉ. आंबेडकरांच्या विचार-शिक्षणाची क्रांतिकारी ज्ञानगुढी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या नावाखाली होणारे कर्णकर्कश डीजे, ध्वनीप्रदूषण आणि दिखाऊ शक्तिप्रदर्शन यावर कठोर प्रश्न उपस्थित करत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निरीक्षण नोंदवले आहे. या निरीक्षणाचे पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने स्वागत करण्यात आले असून, त्याला राष्ट्रीय सलामी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर शहरातील दिल्लीगेट परिसरात रविवार, दि. १७ मे रोजी सकाळी १०.३० वाजता ज्ञानगुढी उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती ज्येष्ठ विधीज्ञ डॉ. कारभारी गवळी यांनी दिली.

न्यायालयाच्या खंडपीठातील मा. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके आणि मा. न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांनी आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौद्धिक विकास आणि वंचितांचे उत्थान अधिक प्रिय असते.

ड. गवळी पुढे म्हणाले की, उभारण्यात येणारी ज्ञानगुढी ही डीजे संस्कृती, ध्वनीप्रदूषण, दिखाऊ राजकारण, मानसिक गुलामगिरी, अज्ञान आणि अंधानुकरणाविरोधातील वैचारिक प्रतिकाराचे प्रतीक असेल. ही गुढी विवेक, संविधानिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि बौद्धिक क्रांती यांचे प्रतीक म्हणून उभारली जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधान, वैज्ञानिक दृष्टिकोन, शिक्षणाची क्रांती, स्वाभिमान आणि विचारस्वातंत्र्य दिले. त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र दिला. त्यांनी कधीही गोंधळ, ध्वनीप्रदूषण किंवा दिखाऊ शक्तिप्रदर्शनाचा पुरस्कार केला नाही. आज अनेक ठिकाणी जयंती उत्सव हे डीजे, फटाके, रस्ते बंद, वाहतूक कोंडी आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धीपुरते मर्यादित होत चालले आहेत.

न्यायालयाने उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे - जर एखादा विद्यार्थी अभ्यास करू शकत नसेल, रुग्ण झोपू शकत नसेल, वृद्ध त्रस्त होत असतील, तर हा कोणता सामाजिक न्याय?

ज्ञानगुढी म्हणजे वाचनालये आणि अभ्यासिकांची प्रेरणा, संविधान वाचनाचा संदेश, विज्ञाननिष्ठ चर्चा, गरीब विद्यार्थ्यांना मदत आणि जातीय मानसिकतेविरुद्ध वैचारिक लढा, असे या उपक्रमाचे स्वरूप असणार आहे.

मोठा आवाज म्हणजे मोठा विचार नसतो; डीजे काही तास घुमतो, पण ज्ञान पिढ्यान्पिढ्या घुमत राहते, असा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

शहरातील सर्व समाजघटकांनी या ऐतिहासिक ज्ञानगुढी उभारणी कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या अभियानासाठी ड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, ड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी प्रयत्नशील आहेत.

# अहिल्यानगरमध्ये गीता परिवाराच्या संस्कार वर्गांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : स्वामि गोविंद देव गिरीजी महाराजांनी स्थापन केलेल्या व डॉ. संजयजी मालपाणी कार्याध्यक्ष असणाऱ्या गीता परिवार तर्फे अहिल्यानगरमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याचे प्रतिपादन गीता परिवाराच्या अध्यक्षा सौ. सुनंदा सोमाणी यांनी केले.

पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी २४ एप्रिल ते तीन मे या कालावधीत शहरातील सहा केंद्रांवर या संस्कार वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. जवळजवळ २५० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. यावर्षी संस्कार वर्गाची थीम 'छत्रपती शिवाजी महाराज' ही ठेवण्यात आली होती. वर्गामध्ये मुलांना शिवरायांची गाणी, शिवगर्जना शिकवण्यात आली तसेच शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी कथा सांगण्यात आल्या. शिवाजी महाराजांच्या राजचिन्हांविषयी माहिती देण्यात आली. आरती सुद्धा शिवरायांचीच घेण्यात आली. यासोबतच मुलांना संस्कृत श्लोक व भगवद्गीतेचे शिक्षण देण्यात आले. या विषयांवर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

संस्कार वर्गात केवळ धार्मिक व सांस्कृतिक शिक्षणावरच भर न देता मुलांसाठी विविध खेळ, हस्तकला आणि वैज्ञानिक प्रयोगांचाही समावेश करण्यात आला होता. त्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. समारोप कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना पालकांनी गीता परिवाराच्या कार्यकर्त्यांची समर्पण भावना खरोखरच कौतुकास्पद असल्याचे सांगितले. संस्कार वर्गामुळे मुलांचा स्क्रीन टाईम मोठ्या प्रमाणात कमी झाला. विविध उपक्रमांमुळे मुले सकारात्मक आणि सर्जनशील कार्यात गुंतली, असे सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या .ते वर्षभर या शिबिराची आतुरतेने वाट पाहत असतात. यावर्षीची शिवाजी महाराजांची थीम विशेष प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरली असल्याचे त्यांनी सांगितले. या संस्कार वर्गांच्या यशस्वी आयोजनासाठी विविध केंद्रांवर कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम पाहिले.

# सभामंडपाच्या कामाचे भूमीपूजन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर-कल्याण रोड प्रभाग क्रमांक ९ मधील श्रीकृष्ण नगर येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या माध्यमातून आमदार संग्राम जगताप आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सभामंडपाच्या कामाचे भूमीपूजन उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापालिका स्थायी समितीचे सभापती पै. सुभाष लोंढे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक निखिल वारे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब सानप, अभिजीत बोरुडे, सुषमा गोळे, सुनीता कर्डिले, विशाखा मिसाळ, पल्लवी बुगे, हिराबाई गोरे, लताबाई लोंढे, राधाबाई अंधारे, रंजना ढवळे, सुभद्रा कुकाटे, आशा गोरे, सुनील वाव्हळ, प्रभाकर कोंडा, अशोक बुगे, भगवान ढवळे, आप्पा कदम, खांदवे सर, सखाराम गोरे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, महापालिकेत मिळालेल्या बहुमतामुळे शहरात सर्वच प्रभागात विकास कामे झपाट्याने होत आहे.

# शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापौरांचे कडक आदेश

## उन्हाळ्यात नागरिकांची गैरसोय होऊ नये; योग्य नियोजन करण्याचे निर्देश : महापौर ज्योती गाडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : शहरात गेल्या एक महिन्यापासून विस्कळीत झालेल्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत. उन्हाळ्याच्या तीव्रतेत नागरिकांना पाण्यासाठी त्रास होऊ नये, यासाठी तातडीने उपाययोजना करून सुरळीत व मुबलक पाणीपुरवठा करण्याचे आदेश त्यांनी दिले.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी वसंत टेकडी येथे भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करत पाणीपुरवठा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी संबंधित अभियंते व कर्मचाऱ्यांशी चर्चा करत त्यांनी पाण्याचे योग्य नियोजन करण्यावर भर दिला. पावसाळा सुरू होईपर्यंत उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

यावेळी अभियंता गणेश गाडळकर यांनी माहिती देताना सांगितले की, मागील महिन्यात वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. काही वेळा काही मिनिटे वीज गेल्यानंतरही तीन ते चार तास पाणीपुरवठा विस्कळीत होतो. एका दिवशी तब्बल बारा तास वीजपुरवठा खंडित झाल्याने शहरातील अनेक भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती.

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी विद्युत विभागाला पत्र देण्यात आले असून, पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विविध पर्यायी उपाययोजना राबविण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. शहरातील प्रत्येक भागात पाणीपुरवठा नियमित व वेळेवर होण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे महापौरांनी सांगितले. या पाहणीवेळी इंजिनिअर गीते,इंजिनिअर ढगे यांच्यासह संबंधित विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

महापौरांच्या या हस्तक्षेपामुळे नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# लेटलतिफ कर्मचाऱ्यांची उपमहापौरांनी केली कानउघडणी !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सकाळी १० वाजता अचानक भेट देत गेटवर उभे राहून अधिकारी व कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली. अचानक झालेल्या या तपासणीमुळे कार्यालयात एकच खळबळ उडाली.

उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी थेट जाब विचारत पुन्हा उशीर झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला. महापालिकेच्या कामकाजात शिस्त राखणे अत्यंत गरजेचे असून नागरिकांना वेळेत सेवा मिळाली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

यावेळी ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, महापालिका ही केवळ नोकरी करण्याचे ठिकाण नाही, तर ती नागरिकांच्या सेवेसाठी असलेली जबाबदारी आहे. प्रत्येक कर्मचारी हा या व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. आपण वेळेवर कामावर आलो नाही, तर त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या जीवनावर होतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी कामावर एक-दोन तास उशिरा येणे ही गंभीर बाब आहे.

ते पुढे म्हणाले, सकाळी पावणे दहा ते सायंकाळी सव्वा सहा या वेळेत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमित उपस्थित राहून आपले काम प्रामाणिकपणे पार पाडावे. नागरिकांना त्यांच्या कामासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागतात, ही स्थिती बदलणे आवश्यक आहे. प्रत्येकाने वेळेचे भान ठेवून जबाबदारीने काम केल्यास महापालिकेची प्रतिमा उंचावेल.

महापालिकेबद्दल आपले कर्तव्य ओळखा. नागरिकांना चांगली, जलद आणि पारदर्शक सेवा देणे हेच आपले ध्येय असले पाहिजे. यापुढे कोणताही कर्मचारी विनाकारण उशिरा येताना आढळल्यास त्याच्यावर नक्कीच कारवाई केली जाईल, असा कडक इशारा यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी दिला.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
गुरुवार, दि.०७ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# नेवासा येथे सुरू झालेल्या खुला कांदा बाजारमुळे शहरासह परिसराच्या अर्थकारणाला बळकटी मिळेल..

## माजी मंत्री शंकरराव गडाख पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा येथील बाजार समितीच्या मुख्य आवारात खुला कांदा विक्रीचा शुभारंभ बुधवारी दि.६ मे रोजी सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर व श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त वेदांतचार्य ह भ प देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.पहिल्याच दिवशी नेवासा कांदा मार्केटमध्ये विक्रमी ३१५ कांदा वाहनांची आवक झाली.नेवासा येथे सुरू झालेल्या खुला कांदा बाजारमुळे नेवासा शहरासह परिसरातील अर्थकारणाला बळकटी मिळेल असा विश्वास माजी मंत्री शंकरराव गडाख पाटील यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला.

नेवासा मार्केट कमिटीच्या प्रांगणात झालेल्या कांदा मार्केट शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी केले. नेवासा बाजार समितीचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा शहरात खुला कांदा मार्केट सुरू करण्यात आले असून याचा फायदा नेवासा शहर व परिसराच्या अर्थकारणाला होणार आहे असे ते म्हणाले. या प्रसंगी बोलतांना महंत देविदास महाराज म्हस्के म्हणाले की सर्वत्र शेतकरी अडचणीत असतांना शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक पाऊल माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या पुढाकाराने नेवासा बाजार समितीने टाकले आहे हे प्रेरणादायी आहे. कांद्याचा बाजार हाकेच्या अंतरावर उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांची गैरसोय दूर होणार आहे. या प्रसंगी बोलतांना महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर म्हणाले की नेवासा शहरात खुला कांदा बाजार सुरू झाल्याने नेवासा शहर व परिसराच्या विकासाला हातभार लागणार आहे.

माजी खा. यशवंतराव गडाख व स्व. मारुतराव घुले यांनी संताना बरोबर घेऊन समाजाच्या हिताचे कामे करण्याची परंपरा माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी समर्थपणे चालू ठेवली असल्याचे सांगत त्यांनी खुला कांदा बाजारास शुभेच्छा दिल्या. माजी मंत्री शंकरराव गडाख म्हणाले, मोठ्या कष्टाने २४ वर्षांपूर्वी घोडेगाव येथे कांदा मार्केट सुरू केले. आज घोडेगाव मार्केटचा राज्यात क्रमांक लागतो,घोडेगाव कांदा मार्केट सुरू करतांना घोडेगाव ग्रामस्थांनी सहकार्य केल्याने गावाला फायदा झाला. नेवासा शहरात खुला कांदा बाजार सुरू झाल्याने शेतकऱ्यांना हक्काची बाजार पेठ उपलब्ध झाली आहे. कांदा बाजार वृद्धिंगत व्हावा यासाठी नेवासकरांनी पुढाकार घ्यावा आपण सर्व मिळून यासाठी प्रयत्नशील राहू अशी ग्वाही देत नेवासा शहरात खुला कांदा बाजार सुरू झाल्याने नेवासा शहरातील व परिसरातील अर्थकारणाला बळकटी मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नेवासा येथे खुला कांदा बाजार सुरू व्हावा यासाठी तालुक्यातील व बाहेरील व्यापारी यांच्याशी संवाद साधून व अभ्यासपुर्वक बाजार सुरू केला आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना कांदा व्यापारी म्हणून संधी दिल्याने शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळणार आहे.



शेतकरी व व्यापारी यांचा समन्वय ठेऊन कांदा बाजार अग्रेसर होण्यासाठी प्रयत्नशील राहू,नेवासा बाजार समितीच्या वतीने नेहमीच शेतकरी हितासाठी प्राधान्य दिले जाते. याबद्दल त्यांनी बाजार समितीचे कौतुक केले. कांदा बाजार शुभारंभ प्रसंगी पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणावर विक्रमी संख्येने कांदा विक्रीस घेऊन आलेल्या शेतकऱ्यांचे माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी स्वागत केले.या प्रसंगी माजी आमदार पांडुरंग अभंग,जेष्ठ विधी तज्ञ अँड.देसाई आबा देशमुख,अंबादास कोरडे यांनी मनोगत व्यक्त करून कांदा मार्केटला शुभेच्छा दिल्या.

मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील,उपसभापती नानासाहेब नवथर व संचालक मंडळाच्या उपस्थितीत कांद्याचा लिलाव सुरू करण्यात आला. शुभारंभ प्रसंगी बाजार समितीचे माजी सभापती डॉ.शिवाजी शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय काळे, तुकाराम शेंडे, कडूबाळ कर्डीले, काकासाहेब शिंदे, रामभाऊ जगताप, भाऊसाहेब मोटे, श्रीरंग हारदे, तुकाराम मिसाळ, दिलीप पवार, एकनाथ धानापुणे,अजित मुरकुटे,गोरक्षनाथ तनपुरे, माऊली कार्ले,संजय सुखधान,जितेंद्र कु-हे,प्रभाकर कोलते, बाळासाहेब गोरे,नवनाथ पठाडे, कृष्णा शिंदे, बाळासाहेब शिंदे, महेश शिंदे, सतीश पटारे, अशोक हारदे, संजय आहेर, अभिजीत लुणीया, भाऊसाहेब कांगुणे, बाबासाहेब जगताप, वैभव नवले, बाबा घुले,सतीश पिंपळे, हिरालाल धनवडे, युवा उद्योजक शिवाजी पाठक,डॉ संतोष फुलारी,बाबासाहेब रोटे,पोपट सरोदे, अरुण निपुंगे, बाळासाहेब तनपुरे, विठ्ठल नाबदे, सोपान पंडित, भगवान काळे, दिगंबर वरखडे, साहेबराव पवार, सुदर्शन वाकचौरे,डॉ. राहुल चव्हाण, गणेश चावरे,बाजार समितीचे सर्व संचालक आदींसह नेवासा तालुक्यातील विविध गावांचे सरपंच,चेअरमन, शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

> नेवासा बाजार समितीच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या खुला कांदा बाजार शुभारंभ प्रसंगी पहिल्याच दिवशी नेवासा तालुक्यासह परिसरातील तालुक्यातून सुमारे ३१५ वाहनांची आवक झाली.प्रति क्विंटल १ हजार १३० रु पर्यत कांद्यास भाव मिळाला.मार्केट कमिटीचे प्रांगण अनेक वर्षांनी पुन्हा फुलून आल्याने पुनरवैभव प्राप्त झाल्याचा आनंद नेवासकर नागरीकांसह कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

## भोकरच्या स्कूल बसचालकाची आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील भोकर येथील यशवंत सुपेकर (वय ५६) यांनी राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केली. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. येथील रहिवाशी व सध्या प्रवरानगर येथील एका नामांकीत विद्यालयात स्कुल बस चालक म्हणून सेवेत असलेले यशवंत आसाराम सुपेकर यांनी सोमवार दि.४ मेच्या रात्री त्यांनी राहत्या घरात छताच्या पाईपला दोरखंड बांधून गळफास घेतला. हा प्रकार कुटुंबियांच्या लक्षात येताच, त्यांना श्रीरामपूर येथील साखर कामगार हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना मृत घोषीत केले. यशवंत सुपेकर यांचे शवविच्छेदनानंतर काल दुपारी भोकर येथील अमरधाम येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रकरणी साखर कामगार हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार तालुका पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन बैसाने हे करत आहेत. त्यांचे आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. त्यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली, दोन भाऊ, तीन बहिणी, सुना, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे, वडाळा महादेव शिवारात राहत असलेले निवृत्त सैनिक तथा लोहमार्ग पोलीस विष्णु सुपेकर व भोकर येथील व्यावसायिक रावसाहेब सुपेकर यांचे ते बंधू होत तर कबड्डीपटू अशोक व गणेश सुपेकर यांचे ते वडील तसेच विजय वायकर, अंकुश साळवे यांचे ते सासरे होत.

## जमीनवादातून शेतकऱ्याचे अपहरण

### पिस्तुलाचा धाक दाखवून बेदम मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शेतजमिनीच्या वादातून एका शेतकऱ्याचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना शिरसगाव शिवारात उघडकीस आली आहे. पिस्तुलाचा धाक दाखवत जबरदस्तीने कारमध्ये बसवून नेल्यानंतर कारखान्यात डांबून मारहाण करण्यात आल्याची तक्रार जखमी शेतकरी पांडुरंग भास्कर गवारे (वय ४८) यांनी दिली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पांडुरंग गवारे हे शिरसगाव (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथील रहिवासी असून शेती व्यवसाय करतात. त्यांच्या सावत्र भावासोबत शेतजमिनीच्या वाटपावरून न्यायालयात वाद सुरू आहे. दरम्यान, ३० एप्रिल रोजी दुपारी साडेदोनच्या सुमारास गवारे हे त्यांच्या गट क्रमांक ६२/१ मधील आंब्याच्या बागेत काम करत असताना आरोपी रोहित दिनकर यादव व त्याच्या साथीदारांनी चारचाकी वाहनातून तेथे येत 'वाद मिटवण्यासाठी चला' असे सांगून त्यांच्याशी संपर्क साधला.

यानंतर रोहित यादव याने गवारे यांच्या डोक्याला पिस्तूल लावून धमकावत जबरदस्तीने वाहनात बसवले. श्रीरामपूरच्या दिशेने नेत असताना वाहनातच शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यांना खंडाळा एमआयडीसी परिसरातील एका कारखान्यात नेऊन पत्र्याच्या खोलीत डांबण्यात आले. तेथे आरोपी दिनकर यादव, आप्पासाहेब गवारे व इतरांनी गवारे यांचे हातपाय बांधून लाकडी दांडे, लोखंडी गज आणि बेल्टने बेदम मारहाण केली. 'जमिनीवरील दावा मागे घे, अन्यथा जीव घेऊ,' अशी धमकी देण्यात आली. तसेच गळा आवळून ठार मारण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

महिलांनीही शिवीगाळ करत मारहाणीत सहभाग घेतल्याचे नमूद करण्यात आले आहे. गंभीर जखमी अवस्थेत गवारे यांना त्यांच्या राहत्या परिसरातील रस्त्यावर फेकून देण्यात आले. त्यानंतर स्थानिकांच्या मदतीने प्रथम श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात व नंतर लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी रोहित दिनकर यादव, दिनकर माधव यादव, आप्पासाहेब भास्कर गवारे, प्रमिला भास्कर गवारे, शितल आप्पासाहेब गवारे व इतर अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## जामखेड नगरपरिषदेचे दोन कर्मचारी लाच लुचपतच्या जाळ्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : जामखेड नगर परिषदे कडून मुलाचे व मुलीचे जन्म दाखले घेण्यासाठी तीन हजार रुपये लाचेची मागणी करू ती स्वीकारताना पालिकेच्या दोघा कर्मचाऱ्यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले.

अभिजीत जालीम भैसडे (जन्म मृत्यू नोंदणी विभाग) व अहमद इलियास शेख (मदतनीस अग्निशमक दल ) या दोघा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या घटनेमुळे जामखेड शहरात एकच खळबळ उडाली आहे.




याबाबत सविस्तर माहिती अशी की तक्रारदार यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये जामखेड नगर परिषदेकडे मुलगा व मुलगी यांच्या जन्म दाखल्याची योग्य कागदपत्रे जोडून मागणी केली होती मात्र एका दाखल्याचे १५ ०० रुपये याप्रमाणे दोनदा करण्याचे एकूण तीन हजार रुपये लाचेची मागणी केली होती दरम्यान तक्रारदार यांनी यासंदर्भात लाच लूज प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती त्यानुसार दिनांक सहा मे रोजी तक्रारदाराकडून ३००० रुपयांची लाच स्वीकारताना नगर परिषदेचे जन्ममृत्यू नोंदणी विभागातील लिपिक अभिजीत भैसाडे (राहणार तपनेश्वर गल्ली मारुती मंदिरासमोर जामखेड) व अहमद इलियास शेख (राहणार काझी गल्ली जामखेड) यांना रंगेहात पकडण्यात आले.

या कारवाईकांनी नाशिक परिक्षेत्राचे लाचलपद प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक भरत तांगडे अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजू आल्हाट पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उपाधीक्षक अजित त्रिकूटे यांच्या नेतृत्वाखाली सापळा पथकातील पोलीस नाईक चंद्रकांत काळे पोलीस कॉन्स्टेबल किशोर कुलधर शेखर वाघ चालक पोलीस हेडकॉन्स्टेबल दशरथ लाड यांनी परिश्रम घेतले या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपाधीक्षक अजित त्रिपुटी हे करीत आहेत.

## सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यातील महिला आरोपीला शिताफिने अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथील चांगदेव सदू पवार वय ३५ यांनी राहुरी पोलीसात दिलेल्या फिर्यादीनुसार राहुरी पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नंबर ४६१/२०२६ बीएनएस कलम १०५,३(५) अन्वये दिनांक ४ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.



त्या अनुषंगाने सदरील गुन्ह्यातील आरोपी सुरेखा सदू पवार राहणार बारागाव नांदूर तालुका राहुरी हिला राहुरी पोलिसांनी ताब्यात घेतले असून सदरील गुन्ह्यात तिला गजाआड करण्यात आले आहे. या आरोपीला राहुरी न्यायालया समोर उभे करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे , उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, यांच्यासह राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक समाधान फडोळ, पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र कांबळे, पोलीस नाईक गणेश सानप, महिला पोलीस कॉन्स्टेबल वंदना पवार यांनी केली आहे.




# लग्नपत्रिकेवर वधू-वरांची जन्मतारीख अनिवार्य

## बालविवाहाला आळा घालण्यासाठी महत्त्वाचा निर्णय

**सुरेश पाटील | राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर** : महाराष्ट्रात बालविवाह रोखण्यासाठी प्रभावी पाऊल उचलत महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने (चडउझउठ) लग्नपत्रिकेवर वधू-वरांची जन्मतारीख नमूद करणे बंधनकारक करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे विवाहपूर्व पडताळणी अधिक सुलभ होणार असून अल्पवयीन विवाहांना आळा बसण्यास मदत होणार आहे.



आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार, लग्नपत्रिका छापताना वधू-वरांचे पूर्ण नाव, पत्ता यासह त्यांची जन्मतारीख स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहणार आहे. यामुळे संबंधित प्रशासन, पोलीस तसेच ग्रामपंचायत स्तरावर वधू-वरांचे वय सहज तपासता येईल. परिणामी, बालविवाहाच्या घटनांवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल. अलीकडील काळात अल्पवयीन मुलींच्या विवाहानंतर मातृत्वाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाने अशा प्रकरणांची चौकशी करण्याचेही निर्देश दिले आहेत. तसेच, बालविवाह आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. सामाजिक कार्यकर्त्यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, हा उपक्रम बालहक्क संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत व्यक्त केले आहे.

ग्रामीण भागात अजूनही परंपरा व अज्ञानामुळे बालविवाहाच्या घटना घडत असल्याने, अशा उपाययोजनांमुळे जागरूकता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, विवाहसोहळ्यांमध्ये नियमांचे पालन करून अल्पवयीन विवाह टाळण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारीने पुढाकार घेतल्यास बालविवाहमुक्त महाराष्ट्र घडवणे शक्य होईल.

